
नीतिशतकम्
जगण्याची एक कला
नीतिशतकम् रेलयानम्
सत्संगतिः
परोपकारः
उद्यमः
धैर्यम्
सन्मित्रलक्षणम्
वाग्भूषणम्
संस्कृत - साहित्य स्थानकम्
वेदाः
ग्रंथाः

चित्र - कु. अंतरा

||ॐ||

# नीतिशतकम् – जगण्याची एक कला

**राष्ट्रीय सौर फाल्गुन शके १९४२ -४३**

भाषासु  मुख्या मधुरा, दिव्या गीर्वाणभारती |

तस्यां हि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम् ||



# संपादकीय मंडळ

## सहभागी विद्यार्थी

१. अंतरा खैरनार
२. स्नेहल मर्दाने
३. सुबोध पिंगळे
४. नेहा गोखले
५. श्रेया कुलकर्णी
६. मानसी महाजन
७. आदित्य मठपती
८. माधव दहीफळे
९. आदित्य वारुडकर
१० प्रथमेश शिरसाठ
११ समीर कांबळे
१२ तनया तांदळे
१३ अद्वैत दलाल
१४ कल्पना सुर्यवंशी
१५ श्रेयस वेदपाठक
१६ अथर्व मोरे
१७ जान्हवी लिमकर
१८ कल्पेशा सोनवणे
१९ सिद्धी खोपडे
२० हर्षदा शेरे
२१ स्वानंदी काळोखे

## मार्गदर्शक अध्यापक

सौ. श्वेतल महात्मा

कु. प्राजक्ता रानडे

सौ.सरिता पत्तेवार

श्री. गणेशदेव सोन्नर

या पुस्तकातील सर्व श्लोक ऐकण्यासाठी पुढील संकेतस्थळाला भेट द्या.

सस्वर श्लोकपठण - कु. चिन्मया इनामदार

https://youtu.be/vX62AYDe

# प्रस्तावना

'



‘ किशोरवयीन मुलांचं **भावविश्व** फार वेगळ असतं ’. निरागस डोळ्यांमध्ये असलेल्या भावनांची जागा आता कुतूहल, जिज्ञासा , स्पर्धा, चढा ओढ , आत्मविश्वास यांनी घेतलेली असते.याच वयात एखाद्या विषयाचा जास्त, सखोल अभ्यास करून काहीतरी मिळवण्याऱ्या इच्छेची **पायाभरणी** होत असते. करिअर ,पुढील आयुष्यातील ध्येय याविषयीचे विचार त्यांच्या गप्पांमध्ये , मनामध्ये ,आजूबाजूच्या वातावरणामध्ये एवढेच काय तर स्वप्नांमध्ये सुद्धा  येत असतात. या वयातच **अभिरुची** ही विशेषत्वाने वाढीस लागणारी भावना आपल्याला दिसते, किंबहुना **काही ठरवून केलेल्या प्रयत्नांनी ती वाढवता सुद्धा ये**ते. असाच **एक ठरवून केलेला प्रयत्न म्हणजे ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयात इयत्ता ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या अभिरुची तासिका.**

**शिक्षण म्हणजे तीन H -  हेड, हार्ट आणि हँड.विचार करायला लावते ते शिक्षण , प्रत्यक्ष कामाची प्रेरणा देते ते शिक्षण आणि याही पुढे जाऊन म्हणेन एखाद्या विषयावर प्रेम करायला लावते ते शिक्षण.**असाच प्रयत्न संस्कृत अभिरुची गटात विद्यालयातील संस्कृत अध्यापकांनी  संस्कृत विषयात आवड असणाऱ्या इ.९वी च्या २१ विद्यार्थ्यांवर  ६ आठवडे केला. **आवड ते अभिरुची** हा प्रवास ६ आठवड्यात पूर्ण करणे शक्य नाहीच ; परंतु अफाट संस्कृत साहित्यातील या वयोगटाला साजेसे असे **आचार्य भर्तृहरीकृत नीतिशतकातील निवडक २१ श्लोक** निवडून या प्रवासाला आम्ही सुरुवात केली.  सध्याच्या स्पर्धेच्या युगात **देववाणी असलेल्या  आणि सर्वच जगाला सर्वच स्तरावर मार्गदर्शन करण्यास समर्थ असलेल्या संस्कृत** भाषेची  गोडी लावण्यासाठी हा प्रवास  **ज्ञानदायी** पण **रंजक** करण्यासाठी  अध्यापकांनी नीतिशतकातील श्लोकांकडे किती किती दृष्टिकोनातून पाहता येईल ? याचा विचार केला. **ठिकाण एकच असले तरी त्या ठिकाणापर्यंत जाण्याचे रस्ते वेग- वेगळे तेही आवडीने निवडलेले आणि रस्त्यावर दिसणाऱ्या घटकांकडे आपल्या**

**आवडीनुसार बघण्याची मुभा असेलेले असतील तर प्रवास कोणालाच  कंटाळवाणा वाटत नाही** . अशाच पध्दतीने नियोजन करून अध्यापकांसोबत विद्यार्थ्यांनी हा प्रवास केला. नीतिशतकातील निवडलेल्या श्लोकांकडे किंबहुना संस्कृत साहित्यातील उपलब्ध श्लोकांचा अभ्यास करतांना तो कशा पद्धतीने करता येईल? याचा एक **नमुना पाठच** विद्यार्थ्यांना या निमित्ताने देता आला.


हे पुस्तक म्हणजे सध्याच्या तंत्रज्ञान युगात आणि कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अधिक तंत्रस्नेही  झालेल्या अध्यापक आणि विद्यार्थ्यांनी आपल्या केलेल्या अभ्यासाला शब्दांमध्ये तसेच तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांमध्ये  ( ध्वनिफीत , चित्रफीत  ) बद्ध करण्याचा केलेला प्रयत्न आहे असे म्हणता येईल.

या  पुस्तकात  ' **नीतिशतक - जगण्याची एक कला** ' या शीर्षकांतर्गत विद्यार्थी या २१ श्लोकांतून ही कला कशी शिकलेत? हे मांडलेले आहे.  भर्तृहरीची शतककाव्ये मुक्तकाव्यात कशी मोडतात ? मुक्त काव्य म्हणजे काय? या प्रश्नांची उत्तरे शोधत असताना संस्कृत साहित्य केवढे समृद्ध आहे ? याचा परिचय करून देण्यासाठी **संस्कृत साहित्याचा परिचय** पुस्तकाच्या सुरुवातीला थोडक्यात करून दिलेला आहे .त्यानंतर **आचार्य भर्तृहरींचा जीवन परिचय आणि नीतिशतका बद्दलची सामान्य माहिती** आपल्याला पुढे वाचायला मिळेल. त्यानंतर ज्या २१ श्लोकांची निवड केलेली आहे त्या २१श्लोकांचा विद्यार्थ्यांनी विविध स्तरावर केलेला अभ्यास आपल्याला पहायला मिळेल. यात तो **श्लोक ,अन्वय आणि त्याचा अर्थ** समजून घेता येईल. यांच्यासोबतच रंजकपणे मांडलेल्या त्या **श्लोकावर  आधारित विविध कृती** वाचकाला आनंद देऊन जातील. यातीलच काही **श्लोकांचा भावार्थ** अभिरुची गटातील **विद्यार्थ्यांनी कथेच्या ,नृत्याच्या** माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न  केलेला आहे .त्यांची ध्वनिफीत आणि चित्रफित तुम्हाला तंत्रज्ञानाच्या साह्याने इथे बघता येईल. शेवटी भर्तृहरीने आम्हाला जगण्याची कला नेमकी कशी शिकवली ? विद्यार्थी जीवनात भर्तृहरीच्या श्लोकांचे किती महत्त्व आहे? हे प्रत्यक्ष भर्तृहरीं पर्यंत पोहोचवण्यासाठी विद्यार्थ्यांनी **पत्रलेखनाचा** आधार घेत आपल्या भावना भर्तृहरी पर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अभिरुची गटात काम करत असताना माझा पाल्य काय काय शिकला ? याविषयीचे काही  **पालकांचे बोलके अभिप्राय** आपल्याला या पत्रानंतर वाचायला किंवा ऐकायला मिळतील . पुस्तकाच्या शेवटी **अध्यापक सुद्धा विद्यार्थी असतो आणि तो पण आपल्या अध्यापनातून अनेक गोष्टी शिकत असतो** याचा  जो काही प्रत्यंतर आला , तो इथे   मांडला आहे. संस्कृत भाषेच्या उज्ज्वल अभ्यासाची  नांदी या प्रकल्पातून कशी झाली? हे उपसंहारातून मांडून  **लहान कार्याचा उपसंहार हा मोठ्या कार्याची नांदी असतो** असा प्रामाणिक भाव आपल्या पर्यंत पोहोचविला आहे.

हे पुस्तक नक्कीच तुम्हाला वाचायला आवडेल अशी खात्री आहे. **धन्यवाद !!!**

**सौ. श्वेतल महात्मा**
**( संस्कृताध्यापिका )**
**ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय , निगडी , पुणे .**

# अर्पण पत्रिका



चित्र – कु. अंतरा खैरनार ( ९ वी गुरुकुल )

यथा राजा तथा प्रजा | **या सूक्तीनुसार प्रेरकच जर उदात्त असेल तर प्रेरिताने त्या उदात्त वाटेवर चालण्याचा प्रयत्न तरी करावा.** आम्हा संस्कृत अध्यापकांचे नव्हे तर संपूर्ण ज्ञानप्रबोधिनीचे किंबहुना सत्कार्य करणाऱ्या सर्वांचेच प्रेरक आ.स्वर्गीय वामनराव अभ्यंकर तथा भाऊ यांच्या सहवासातून अनेक संस्कार आमच्यावर झालेत. संस्कृत भाषेच्या विकासासाठी, अभ्यासासाठी त्यांनी केलेले कार्य समोर ठेवून आम्ही सर्व कार्यरत आहोत आणि यापुढेही राहू. आ.भाऊंचे वडील नारायणराव हे संस्कृतपण्डित असल्यामुळे अगदी लहानवयातच त्यांच्यावर स्तोत्रपाठांतर , सुभाषित म्हणण्याचे संस्कार झाले होते. आ.भाऊंचे पूर्ण नीतिशतक पाठ होते . आणि विद्यार्थी दशेतच ते पाठ व्हावे असा त्यांचा आग्रह होता. आ.भाऊं कडून नीतिशतकातील काही श्लोक शिकण्याचा योग आम्हाला आला हे आमचे मोठे भाग्यच आहे . त्यांच्याच प्रेरणेने आम्ही हे काम करू शकलो .

हे काम करत असताना आम्ही संकल्प करत आहोत की आम्हीही संस्कृत भाषेचा अधिकाधिक अभ्यास करीत करीत समृद्ध होत राहू. त्यांची संस्कृत विषयाप्रति असलेली श्रद्धा, भक्ती व प्रेम आम्ही आमच्या आयुष्यात उतरविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करू. म्हणून आमच्या संस्कृत अभिरुची गटाने केलेले हे छोटेसे काम आम्ही **त्या ज्ञानमूर्ती , योगी ,थोर तत्त्वज्ञ, विचारवंत आ.भाऊंना समर्पित करत आहोत.**धन्यवाद !!!

**- संपादन मंडळ (संस्कृत अभिरुची )**

# अनुक्रमणिका


❖ संस्कृतसाहित्यपरिचय

❖ आचार्यभर्तृहरींचा जीवनपरिचय व नीतिशतकपरिचय

❖ निवडक श्लोक

१) ईश्वरानुभूतिः |

२) ज्ञानस्य महत्त्वम् |

३) कार्यनैपुण्यम् |

४) वाग्भूषणम् |

५) गर्वहरणम् |

६) लोकस्थितिः |

७) सत्सङ्गतिः |

८) प्रतिभासामर्थ्यम् |

९) उत्तमजनाः |

१०) वृथायाचना |

११)असिधाराव्रतम् |

१२) परोपकारः |

१३) सन्मित्रलक्षणम् |

१४) मित्रता |

१५) गुणभूषणानि |

१६) सुधीराः |

१७) धैर्यवृत्तिः |

१८) परोपकारप्रशंसा |

१९) पूर्वसंचितः |

२०) उद्यमप्रशंसा |

२१) प्रतिज्ञामहती |

❖ आचार्य भर्तृहरीस पत्र

❖ अभिप्राय


❖ उपसंहार

❖ परिशिष्ट

- वेदपरिचय
- वेदांगपरिचय
- दर्शनपरिचय
- उपनिषदपरिचय
- शब्दार्थ

****************

# संस्कृत साहित्याचा इतिहास




**वैदिक साहित्याचा इतिहास जाणून घेऊयात प्रत्यक्ष आदरणीय स्वर्गीय संस्कृत महर्षी श्री.वामनराव अभ्यंकर तथा आ. भाऊ**

https://youtu.be/R7zhm6gHmR8

## आचार्य भर्तृहरि संक्षिप्त परिचय

**भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती ।**

**तस्यां हि मधुरं काव्यं तस्मादपि सुभाषितम् । ।**

संस्कृत भाषा भारतीयांची अतिशय प्राचीन भाषा आहे. वेदांची व वेदवाङ्मयाची निर्मिती संस्कृत भाषेतून झाली.भारताचा उद्धार या भाषेतूनच झाला. त्यामुळे संस्कृत भाषेला अनन्यसाधारण महत्व आहे. वेदांमध्ये ऋग्वेद हा अतिशय प्राचीन वेद आहे. संस्कृत भाषेला आर्यभाषा असे म्हणतात. संस्कृत भाषेमध्ये लेखन करून अनेक ऋषींनी आपले मोलाचे योगदान दिले आहे. अशाच या अनेक ऋषी आचार्यांपैकी भर्तृहरी होऊन गेले.हे एक क्षत्रिय राजा होते.

हे एक महान संस्कृत कवींपैकी एक महान कवीलेखक झाले. कवी भर्तृहरी यांची ओळख तीन महान शतकांमधून होते.यापैकी पहिले शतक नीतिशतक, शृंगारशतक व वैराग्य शतक या प्रत्येक शतकात शंभर - शंभर श्लोक आहेत. कवी भर्तृहरी यांचा काळ म्हणजेच विक्रम संवताच्या ५६ वर्षापूर्वी चा होता. विक्रमादित्य यांचे बंधु भर्तृहरी हे विक्रमादित्य यांचे पेक्षा अग्रज होते अशी ही आख्यायिका आहे. हे उज्जैन शहराचे राजा होते. आणि चंद्रगुप्ताचे दुसरे मोठे बंधू म्हणजेच कवी भर्तृहरी होय. भर्तृहरी यांच्या वडीलाचे नाव चंद्रसेन असे होते व त्यांच्या पत्नीचे नाव पिंगला असे होते.कवी भर्तृहरी हे संस्कृत भाषेचे मुक्त कवितेचे कवी होते.यांच्या तिनी शतकामुळे त्यांना एक यशस्वी आदर्श व लोकप्रिय कवी म्हणतात.कवी भर्तृहरी यांची भाषा व वाणी अतिशय मनमोहक, गोड, रसाळ आणि सरळ अशी होती. लेखनशैली अतिशय सोपी सहज सुगम आहे. आपण असे म्हटले तरी चालेल ही मनाला व हदयाला प्रभावित करणारी भाषा होती. त्यांच्या शतकात छंदांची विविधता आहे. विषयानुसार भावनापूर्ण छंदांचा वापर त्यांनी तीनही शतकात केला आढळतो. वेळेप्रमाणे तीनही शतके आपणास एक आदर्श प्रेरणादायी व मार्गदर्शक म्हणून आजही उपयुक्त ठरत आहेत व ठरतील यामध्ये तीळमात्र शंका नाही.उज्जैन शहरातील राजाची म्हणजेच कवी भर्तृहरीची एक प्रसिद्ध व खूप लोकप्रिय असलेली कथा प्रसिद्ध आहे. एकदा उज्जैन शहरात महान योगी गोरखनाथ यांचे आगमन झाले होते. त्यावेळी आपल्या राजदरबारात योगी गोरखनाथाचे आदरातिथ्य व सत्कार केला.कवी भर्तृहरीनी खूप श्रद्धेने गोरखनाथांची सेवा केली. गुरु गोरखनाथ यांनी प्रसन्न होऊन एक फळ राजा भर्तृहरीला दिले , आणि असे सांगितले की जो या फळ खाईल तो सदैव सुंदर व चिरतरुण दिसणार आहे. वृद्धावस्थेचा स्पर्श सुद्धा त्याला होणार नाही. राजाने खूप आनंदाने ते फळ स्वीकारले. योगी गोरखनाथ यांना यथोचित सत्कार करून निरोप दिला. ते फळ घेऊन राजा आपल्या राजवाड्यात आला, व त्यांनी थोड्या कालावधीनंतर विचार केला की राजाला सुंदर व तरुण दिसण्याची एवढी काही गरज वाटली नाही.हे फळ त्यांनी आपली तिसरी पत्नी जिच्यावर राजा खूप आकृष्ट होता तिला म्हणजेच पिंगला हिला दिले. ती कवी भर्तृहरीची तिसरी पत्नी होती अतिशय सुंदर व रूपवान होती.पण त्या पिंगला नावाच्या पत्नीने हे फळ राजाच्या कोतवालाला दिले की तिचा तो आवडता व्यक्ती होता ती तिच्यावर प्रेम करीत होती. पण हे राजाला माहीत नव्हते आणखी आश्चर्याची गोष्ट म्हणजे कोतवालाने हे फळ स्वतः न खाता त्याच्या एका आवडत्या वेश्येला दिले. कारण ती तरूण व सुंदर राहिली तर आपल्या इच्छा पूर्ण होतील. पण याहूनही रहस्याची गोष्ट सांगायची म्हणजे वेश्याने हे फळ न खाता फळाबद्दल असा विचार केला.

की हे फळ मी खाल्ले तर शेवटी माझा काय उपयोग ? प्रत्येक व्यक्ती माझा उपभोग आणखी जास्त काळ घेईल या नरकातून मुक्त होण्यासाठी मला हे फळ सेवन करणे योग्य नाही. जर हे फळ राजाने सेवन केले तर राजे चिरतरुण राहतील व प्रजेची सेवा करतील. यापेक्षा हे फळ राजा शिवाय दुसऱ्याने न खाणेच उपयोगाचे होईल.एका महान व्यक्तीच्या उपयोगात आणले तर आणखीन लाभदायी होईल. कारण मी जर हे फळ खाल्ले तर हे वाईट काम मला करतच राहावे लागेल किमान हे फळ न खाता मला या नरकमय जीवनातून मुक्ती तरी मिळेल म्हणून या फळाची ज्याला जास्त गरज आहे. असा विचार करून ती प्रजेची रक्षा करणारा राजा भर्तृहरि याला ते फळ देते. राजा भर्तृहरी हे फळ पाहून विचारातच पडला व आश्चर्याने त्याने वेश्येस विचारले की हे फळ कुठे प्राप्त झाले. वेश्येने सांगितले की कोतवाल म्हणजेच माझा प्रियकर त्याने मला हे फळ दिले.राजाने लवकरात लवकर कोतवालास राजवाड्यात बोलावले व सक्ती करून कोतवालास विचारले नंतर कोतवालाने सांगितले, की राणी पिंगलाने हे फळ मला दिले. हे ऐकून राजाच्या पायाखालची जमीनच सरकली आणि भर्तृहरीला समजले की माझ्या पत्नीने मला धोका दिला. आणि त्यांच्या मनात वैराग्याचा भाव निर्माण झाला व ते राज्यकारभार बंधु विक्रमादित्याला सोपवून तपस्येसाठी एका गुहेत तपस्या करण्यासाठी बसले.

या प्रसंगी रचित श्लोक-

**यां चिन्तयामि सततं मयि स विरक्ता**

**साप्यन्यमिछति जन स जनोऽन्यसक्तः |**

**अस्मत्कृते च परितुष्यति काचिदन्या**

**धिक् तां च तं च मदनं च इमां च मां च ||**

पुढे ध्यान, चिंतन ,मनन व वेदवाङ्मयाचा अभ्यास केला. बारा वर्षांची तपस्या पूर्ण केली व आचार्य कवी यांचा दुसरा जन्म झाला. परिणामस्वरूपी त्यांचे वाङ्मय आपल्याला वाचण्यासाठी उपलब्ध आहे. कवी भर्तृहरीनी ज्या गुहेत तपश्चर्या केली. ही गुहा उज्जैन शहरात क्षिप्रा नदी जवळ आहे.या गुहेत श्वास घेण्यास सुद्धा सर्वसाधारण व्यक्तीला खूप त्रास होतो आणि अशा गुहेत तपस्या करणे म्हणजेच आणखी एक तपस्या होय. पण वैराग्य वृत्ती चा भाव मनात ठेवून ही तपस्या कवीनी केली.यात तपस्येचे फळ म्हणजेच कवी भर्तृहरिचे वैराग्य शतक होय. असे म्हणता येईल. व पुढे नीतिशतक व शृङ्गारशतक हे तीन शतके कवींनी लिहिली.

**विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्नगुप्तं धनम्**

**विद्या भोगकरी यशः सुखकरी विद्या गुरूणां गुरुः ।**

**विद्या बंधुजनो विदेशगमने विद्या परं दैवतम्**

**विद्या राजसु पूजिता न तु धनं विद्याविहीनः पशुः॥**

ज्ञान हेच मनुष्याचे सर्वोत्तम धन आहे. ज्ञानाशिवाय मनुष्य पशुसमान आहे ,असे या नीतिशतकातून आपल्याला लक्षात येते.

या अभिरुचीनिमित्त आपण नीतिशतकातील २१ श्लोकांचा अभ्यास करणार आहोत. आचार्य तीनही शतक का लिहु शकले, तर ते राजा असल्यामुळे आयुष्यात सर्व प्रकारचे अनुभव त्यांनी मिळविले होते.खरंतर राजे लोक सर्व ऐश्वर्यसंपन्न असल्यामुळे त्यांच्या जीवनात सर्व प्रकारचे संघर्ष व अनुभव यांचा साठा असतो.यामुळेच त्यांच्या तीनही शतकातील सर्व श्लोक अतिशय मानवी जीवनाशी निगडीत आहेत. सामान्य व्यक्तीच्या अनुभवाच्या आधारे प्रत्येक माणसाला श्लोक शिकवण देत असतात.

आचार्य यांची लेखनशैलीची वैशिष्टये विचारांची प्रौढता,प्रगल्भता आणि परिपक्वता अढळ जीवननिष्ठा व जीवन संबंध मोक्षप्राप्तीसाठी सुदृढ तत्त्वज्ञान, साधक आवस्थेत परत होणारी भक्ती नम्र योग्याची वृत्ती आणि संस्कृत भाषेवरील असामान्य प्रभुत्व या सर्व गोष्टींचा परिपाक भर्तृहरींच्या लेखनशैलीत आढळून येतो.




**-भर्तृहरिपरिचयमाहितीसंकलन**

**(श्री.गणेशदेव सोन्नर)**

श्लोक क्र.१

## ईश्वरानुभूतिः |

## मङ्गलं हि मङ्गलादीनि |

**दिक्कालाद्यनवछिन्नानन्तचिन्मात्रमूर्तये |**

**स्वानुभूत्येकमानाय नमः शान्ताय तेजसे ||**

**अन्वयः-दिक्कालाद्यनवछिन्नानन्तचिन्मात्रमूर्तये,स्वानुभूत्येकमानाय, शान्ताय तेजसे**

**नमः (अस्तु ) |**

**अर्थ-** दिशा व काल इत्यादि तत्वांनी मोजता न येण्यासारखा ,अनंत तसा केवळ चैतन्यस्वरूप आहे. ज्याच्या अस्तित्वाचे एकमेव प्रमाण मनुष्याचा स्व:तचा अनुभव हाच आहे. अशा शांत ज्योतिस्वरूप ब्रह्माला माझा प्रणाम असो.

### समश्लोकी

**दिक्काल यांहि नपवे कधिं भिन्नभावा| जी होय केवळ अनन्त चिदेक ठेवा ||**

**आत्मानुभूति च असे बाल एक जीला | माझी नमस्कृति तये स्तिमिप्रभेला ||**



# जिज्ञासापत्रम् |

**परमेश्वरस्य स्वरुपवचनानि |**

**न तस्य प्रतिमा अस्ति |   यजुर्वेद .ओमिति ब्रह्म || तैत्तिरीय उप.**


**सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म | तैत्तिरीय उप.ओंकार एवेदं सर्वम् | छान्दोग्य उप.**

**सर्वं खल्विदं ब्रह्म | छान्दोग्य उपअहं ब्रह्मास्मि | छान्दोग्य उप.**

**विज्ञानमानन्दं ब्रह्म | बृहदारण्यक सत्यं ब्रह्म | बृहदारण्यक उप.**

**अयं आत्मा ब्रह्म | बृहदारण्यक.ओमित्येकाक्षरं ब्रह्म | सूर्योपनिषद.**

**स वा अयमात्मा ब्रह्म | कैवल्य उप.अहं शिवस्वरुपमस्मि | कैवल्यउप.**




**श्लोकाधारित कथा या संकेतस्थळावर जावून ऐका व श्लोक  समजून घ्या.**

https://youtu.be/zZ5karzCdyI

## ज्ञानस्य महत्त्वम् |

**विद्या नाम  नरस्य रूपमधिकंप्रच्छन्नगुप्तं धनम्**

**विद्या भोगकरी यश:सुखकरी विद्या गुरूणां गुरु:।**

**विद्या बन्धुजनो विदेशगमने विद्या परं दैवतम्**

**विद्या राजसु पूज्यते न तु धनं विद्याविहीन: पशु:॥**

***अन्वय:*-विद्या नाम  नरस्य अधिकं रूपम् अस्ति | प्रच्छन्नगुप्तं धनम्, विद्या भोगकरी यश:सुखकरी (च) ।विद्यागुरूणां गुरु: । विदेशगमने विद्या बन्धुजन: । विद्या परं दैवतम्  । विद्या राजसु पूज्यते न तु धनम् विद्याविहीन: पशु: (एव) ।**

**अर्थ-**विद्या हे माणसाचे जास्तीचे सौंदर्य आहे, खूप सुरक्षित व गुप्त धन आहे.ज्ञान हे माणसाचे यश , कीर्ती, वैभव व सुखाना मिळवून देणारे आहे. सर्व गुरुंची गुरु ही विद्या आहे .दुसर्या देशात गेल्यावर खरी सोबतीण किंवा नातेवाईक विद्याच  आहे.विद्या सर्व श्रेष्ठ देवता आहे.राजे लोक विद्येचे पूजन करतात. धनाचे नव्हे.विद्येशिवाय असलेला माणूस म्हणजे केवळ पशु  आहे.

### समश्लोकी

**विद्या हे रूप पुरुषास बरवें कीं झाकलें द्रव्यही |**

**विद्या भोग सुकीर्तिदयक पहा जे मान्यमान्यांसही||**

**विद्या बन्धु असे विदेशगमनी विद्या महादेवता |**

**विद्या पूज्य नृपास हा नरपशू ती वेगळा तत्त्वतां ||**



जिज्ञासापत्रम् |

## विद्यायाः महत्वम् | -(समर्थी श्लोक)

न चोरहार्यं न राजहार्यं न भ्रातृभाज्यं न च भारकारी |

व्यये कृते वर्धते एव नित्यं विद्याधनं सर्वधनप्रधानम् ||

अर्थ-

विद्या ज्ञान हे असे धन आहे . जे चोर चोरून नेऊ शकत नाही. राजा हिसकावू शकत नाही. भावामध्ये वाटले जाऊ शकत नाही. त्याचे ओझे ही होत नाही. जे दिल्याने दररोज वाढते म्हणून सर्व धनामध्ये प्रमुख ज्ञान हेच धन आहे.

अपूर्वः कोपि कोशोऽयं विद्यते तव भारति |

व्ययतो वृद्धिमायाति क्षयमायाति संचयात् ||

अर्थ-हे सरस्वती देवी ( विद्या देवता ) तुझा कोष ( साठा )

अपूर्व असा आहे. जो दिल्याने वाढतो व ठेवल्याने कमी होतो.

या श्लोकावर आधारित नृत्य पाहून श्लोक समजून घेण्यासाठी या लिंकवर क्लिक करा.

https://www.youtube.com/watch?v=X64_Vn37h2M

## कार्यनैपुण्यम्|

**अम्भोजिनीवननिवासविलासमेव,हंसस्य हन्ति नितरां कुपितो विधाता |**

**न त्वस्य दुग्धजलभेदविधौ प्रसिद्धां, वैदग्ध्यकीर्तिमपहर्तुमसौ समर्थः ||**

अन्वयः – **विधाता कुपित: अस्ति |(सन्) हंसस्य हन्ति अम्भोजिनीवनविलासनिम् एव नितरां हन्ति |**

**असौ तु अस्य दुग्धजलभेदविधौ प्रसिद्धां वैदग्ध्यकीर्तिम् अपहर्तुं न समर्थ: ( अस्ति) |**

अर्थ-ब्रह्मदेव रागावून हंसाचे कमलिनीच्या ताटव्यातील आनंदाने वावरणे राहणे पूर्णपणे थांबवू शकतो. परंतु त्याची दूध व पाणी वेगळे करण्याच्या बाबतीत प्रसिद्ध असलेली बाब तीच कौशल्यामुळे मिळालेली बाब ( हंसाची हुशारी खास वैशिष्ट्ये ) हिरावून घेण्यास समर्थ नाही.

### समश्लोकी

**अदृष्ट झालें प्रतिकूळ जेव्हा, वारीला तैं पद्मविहार तेव्हा |**

**जे क्षीरनीरादिविवेक नाना , त्या हंसकीर्तीस हरूं शकेना ||**



## जिज्ञासापत्रम् |

**कौशल्य संपन्न व्यक्ती ओळखून जोड्या लावा.**

| गायक: गयनंम् | नर्तक: नृत्यम् | क्रीडा खेलनम् | वाद्यम् वादनम् | धावक: धावनम् | वक्ता वक्तृत्वम् | नेता नेतृत्वम् | अभिनेता अभिनय: |
|---|---|---|---|---|---|---|---|
| माईकल जाक्सन | क्री. रोनाल्डो | जाकीर हुसेन | अमिताभ बच्चन | उसेन बोल्त | नितीन बानगुडे | भीमसेन जोशी | बाळ ठाकरे |

**समर्थश्लोक**

हंस: श्वेत: बक: श्वेत: को भेद: हंसबकयो:|

नीरक्षीर विवेके तु हंसो हंस: बको बक : ||

**अर्थ- हंस व बगळा दोघेही पांढरे आहेत, परंतु दोघात भेद काय आहे ? दुध व पाणी वेगळे करण्याच्या वेळी हंस हंस व बगळा बगळा असतो.**

**या श्लोकावर साभिनय नृत्य पाहण्यासाठी या लिंक वर क्लिक करा व नृत्यातून श्लोक समजून घ्या.**

**लिंक -**https://youtu.be/CwP5WvO-7AQ

श्लोक क्र.४

## वाग्भूषणम्|

**केयूराणि न भूषयन्ति पुरुषं हारा न चन्द्रोज्ज्वला:**

**न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालङ्कृता मूर्धजा: |**
**वाण्येका समलङ्करोति पुरुषं या संस्कृता धार्यते**

**क्षीयन्ते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम् ||**

**अन्वय - केयूराणि न, चन्द्रोज्ज्वलाः हाराः न,स्नानं न,विलेपनं न,कुसुमं न, अलंकृताः मूर्धजाः न, या संस्कृता धार्यते सा एका वाणी पुरुषं अलंकरोति | ( सर्वाणि ) आभूषणानि क्षीयन्ते | केवलं सततं वाग्भूषणम् एव खलु भूषणम् ( अस्ति) |**

**अर्थ-**बाहुभूषणे,चंद्राप्रमाणे तेजस्वी हार ,स्नान.उटीलेपण,फुले ,सजविलेले केस,मनुष्याला सुशोभित करीत नाहीत. संस्कार केलेली जो वाणी धारण केली जाते, ती एकमेव वाणी मनुष्याला योग्य रीतीने विभूषित करते. इतर अलंकार नाहीसे होतात.परंतु वाणी हा दागिना कायमचा आहे.

## समश्लोकी

**सद्रत्नहार,मणि, ताइत बाहुदंडी | कीं स्नान,चंदन,फुलें,तशि लांब शेंडी ||**

**यांनी खरी घडतसे पुरुषा न शोभा |वाणीच भूषण सुशिक्षित शब्दगर्भा. ||**



## जिज्ञासापत्रम् |

### मधुरवाग्महत्त्वम् |

**प्रियवाक्य प्रदानेन सर्वे तुष्यन्ति जन्तवः |**

**तस्मातदेव वक्तव्यं वचने क दरिद्रता ||**

**प्रिय बोलल्याने सर्व प्राणी संतुष्ट होतात. म्हणून त्यांच्यासोबत गोड बोलावे.**

**वचनात कशले दारिद्र्य ? म्हणजे गोड बोलण्यासाठी काही रक्कम मोजावी लागत नाही.**

**आभूषणे व शरीर-अवयवाच्या जोड्या जुळवा.**

| आभूषणे | अवयव |
|---|---|
| पैंजण , साखळी, बाजूबंद ,बांगड्या, अंगठी , कुंडल, जोडवे ,टीळा चंद्रहार, केश, भिकबाळी ,गजरा, मंगळसूत्र, झुमका, बुगडी , गोठ ,मेखला, छल्ला , पाटल्या, ,कंबरपट्टा. नथ , ठुशी | हात , पाय , नाक, कान , डोक , गळा पाय , कंबर , हातबोटे. पायबोटे , बाहू , मनगट केश ,कपाळ |

या शलोकावर साभिनय नृत्य पाहण्यासाठी या लिंक वर क्लिक करा व नृत्यातून श्लोक समजून घ्या.

लिंक -https://youtu.be/tK_s7VnyH0s

## गर्वहरणम् |

**यदा किञ्चिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्ध: समभवं**

**तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मन: ।**

**यदा किञ्चित्किञ्चिद् बुधजनसकाशादवगतं**

**तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगत: ॥**

**अन्वय: - यदा अहं किञ्चिज्ज्ञ: (तदा) (अहं) द्विप: इव 'दान्ध: समभवम् । तदा मम मन: 'सर्वज्ञ: अस्मि ' इति अवलिप्तम् अभवत् । यदा बुधजनसकाशात् किञ्चित् किञ्चित् अवगतम् ,तदा (अहं) मूर्ख:अस्मि (इति ज्ञात्वा) मद: ज्वर: इव व्यपगत:|**

**अर्थ-**जेंव्हा मला थोडेसे ज्ञान झाले होते, तेंव्हा मदोन्मत्त हत्तीप्रमाणे गर्वाने अविचारी बनलो. तेंव्हा मला सर्व ज्ञान आहे. अशा विचाराने माझे मन गर्विष्ठ बनले. जेंव्हा शहाण्या माणसांच्या जवळ राहून थोडे थोडे समजू लागले, तेंव्हा मी मूर्ख आहे असे समजून आल्याने ताप निघून जावा त्याप्रमाणे माझा गर्व पार दूर निघून गेला.

## समश्लोकी

**जधी कांही- कांही हरि-कवि असे शब्द शिकलों,तधी मी सर्वज्ञ,द्विपसम मदें याच भरलो;**

**जधी 'कांही नेणे' म्हणुनि वदले पंडित मला,तदा माझा गर्वज्वर सकळही हा उतरला**



जिज्ञासापत्रम् |

**श्लोकार्थ अधिक समजून घेण्यासाठी हा प्रसंग वाचूया.**

**एक घडलेली गोष्ट...**

**१९७९ सालची सत्यघटना.**

सकाळची वेळ होती.. त्रिवेंद्रमचा समुद्र किनारा शांत वाटत होता. फारशी गर्दी नव्हती. काही लोकांचीच ये-जा होती. एक बऱ्यापैकी वृद्ध गृहस्थ किनाऱ्यावर आसन टाकून एकाग्रतेने श्रीमद् भगवत गीता वाचत होते.

तेवढ्यात एक उच्च शिक्षित पण देव धर्म न मानणारा तरुण तिथे येऊन त्यांच्याजवळ मुद्दाम टिंगल करण्याच्या उद्देशाने बसला, आणि त्या तरुणाने टोमणे मारायला सुरुवात केली. गीता वाचणारी व्यक्ती मात्र शांत होती.

तो तरुण म्हणाला, एवढा वेळ जर अभ्यास करून देशासाठी काही केले असते तर आज देश कुठल्या कुठे प्रगती पथावर उंच गेला असता. त्या व्यक्तीने ते एक पान वाचून पूर्ण केले व त्या तरुणास अगदी शांतपणे माहिती विचारली की कुठून आलास, शिक्षण किती , व पुढे काय करणार आहेस ? त्या तरुणाने थोडेसे गुर्मीतच उत्तर दिले की तो कलकत्याहून आला आहे. सायन्सचा उच्च शिक्षित आहे आणि भाभा अटोमिक रिसर्च संस्थेत पुढील संशोधन करण्यासाठी आलो आहे..

पुढे मोठ्या तुसडेपणाने - तुम्ही बसा इथे पोथ्या पुराणे वाचत, तुम्हाला देशाची काळजी नाही, वगैरे वगैरे त्याने बरीच मुक्ताफळे उधळली. तरीही ती व्यक्ती शांतच होती,,,

थोड्या वेळाने - त्या गीता वाचणाऱ्या व्यक्तीने उठून आसन गुंडाळले तसे एकदम ४ दणकट कमांडो बॉडीगार्ड धावत त्या व्यक्तीजवळ आले व एक मोठी मजबूत शासकीय लाल दिवा असलेली कार एक ड्रायव्हर घेऊन आला व आदबीने सलाम करून दार उघडून उभा राहिला.

हे सगळं पाहिल्यावर मात्र तो तरुण पुरता गोंधळून गेला व त्या व्यक्तीची क्षमा याचना करू लागला.

त्याने घाबरत घाबरत ओळख विचारली, तेव्हा ती व्यक्ती शांतपणे स्मितहास्य करून म्हणाली की, "ज्या संस्थेत तू संशोधन करण्यास आला आहेस ना त्या भाभा अटोमिक रिसर्च संस्थेचा मी चेअरमन आहे... डॉ. विक्रम साराभाई ."

मग मात्र तो नास्तिक , देवा धर्माची टिंगल करणारा तरुण ओशाळला व चक्क रडू लागला, माफी मागू लागला...

तरीही डॉ, साराभाई शांतच.. ते म्हणाले, जर या जगात एखादी गोष्ट आहे , तर नक्कीच त्याचा कोणीतरी निर्माता आहे, मग ती आजची असो की महाभारत कालीन असो . आणि हे त्रिकालाबाधित सत्य ही गीता सांगते. तेंव्हा - टिंगल करण्यापूर्वी वाचून पहा, सर्व सायन्स देखील यातच आहे . ही गोष्ट घडली तेव्हा भारतीय पातळीवरच्या विविध १३ संशोधन संस्था या डॉ. साराभाईंच्या नांवावर होत्या.तर तत्कालीन पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी अणू संशोधन मंडळाचेही अध्यक्ष म्हणून डॉ. साराभाई यांची नियुक्ती केली होती.

## जिज्ञासापत्रम्।

**शिवपार्वत्योः रञ्जशिकः संवादः**

**पार्वती शिवं पृच्छति,-कः त्वम्?**

**शिवः-शूली (=वेदनापीडितःइति अन्यःअर्थः)**

**पार्वती-वैद्यं प्रति गच्छ।**

**शिवः-अयि प्रिये अहं नीलकण्ठः अस्मि।(मयूरःइति अन्यःअर्थः)**

**पार्वती-तर्हि एकां केकां कुरु।**

**शिवः-पशुपतिः अहम्।**

**पार्वती-तव विषाणे(शृङ्गे)न दृश्ये।**

**शिवः-अयि मुग्धे(अग वेडाबाई),अहं स्थाणुः(स्तम्भः),न जानासिकिम्?**

**पार्वती-नाथ,वृक्षः वक्तुं न शक्नोति।**

**शिवः-अहं शिवायाः(१.पार्वत्याः २.शृगाल्याः[कोल्हीचा])पतिः।**

**पार्वती-तर्हि मत्समीपे किमर्थम् आगतः?अरण्ये गच्छ।**

## लोकस्थितिः - जगरहाटी

**दाक्षिण्यं स्वजने दया परिजने शाठ्यं सदा दुर्जने**
**प्रीतिः साधुजने नयो नृपजने विद्वज्जनेष्वार्जवम् |**
**शौर्यं शत्रुजने क्षमा गुरुजने नारीजने धूर्तता**
**ये चैवं पुरुषाः कलासु कुशलास्तेष्वेव लोकस्थितिः ||**

**अन्वय** – **स्वजने दाक्षिण्यम् , परिजने दया , दुर्जने सदा शाठ्यम् , साधुजने प्रीतिः , नृपजने नयः , विद्वत् जनेषु आर्जवम् , शत्रुजने शौर्यम् ,गुरुजने क्षमा ,नारीजने धूर्तता , एवं च ये पुरुषाः कलासु कुशलाः तेषु एव लोकस्थितिः |**

**अर्थ** - आपल्या आप्त स्वकियांशी त्यांच्या कलानुसार वागणे (आदर भावाने ),नोकर वर्गाशी दयेने , दुर्जनांशी कुटीलतेने , सज्जनांशी प्रेम ,राजेलोकांशी न्यायानुसार वर्तन ,विद्वानांशी सरळपणे ,शत्रूंशी शौर्य , वडीलधारी व्यक्तींशी सहनशीलतेने ,स्त्रियांशी धूर्तपणे अशाप्रकारे जी माणसे कलानिपुण असतात त्यांच्याच ठिकाणी जगराहाठी ( वर्तन मर्यादा ) दिसते .

### समश्लोकी

**आप्तांची बहु भीड ,सेवकजनी कारुण्य ,विद्वज्जनी**
**निष्कापठ्य, शठत्वदुर्जनजनी ,संतोष की सज्जनी ,**
**डंका शत्रुजनी ,क्षमा गुरुजनी ,नारीजनी धूर्तता ,**
**ज्यांची हे स्थिति यापरीस असती ते शाहणे तत्वतः .**



# जिज्ञासापत्रम्

मानवी भावना

शाठ्यम् – शठस्य भावः |

दाक्षिण्यम् – कर्तव्यपरायणता

आर्जवता – सुस्वभावता

## जगद्गुरु श्रीकृष्ण आणि त्याची आदर्श जीवनपद्धती

| गुण | प्रसंग |
|---|---|
| स्वजने दाक्षिण्यम् | माता यशोदा ,देवकीवरील प्रेम |
| परिजने दया | सेनापती सात्यकी सोबत असलेले नाते |
| साधुजने प्रीतिः | राजमाता कुंतीवर असलेले प्रेम |
| दुर्जने सदा शाठ्यम् | दुर्योधन आणि त्याचे सहकारी यांच्याशी कुटीलतेने वागणूक |
| नृपजने नयः | द्रौपदीचा भाऊ दृष्टदयुम्न याच्याशी मुत्सद्दीपणाचे धोरण |
| विद्वत् जनेषु आर्जवम् | कर्णाच्या विद्वत्तेचा आदर |
| शत्रुजने शौर्यम् | शिशुपाल आणि कंस यांचा वध |
| नारीजने धूर्तता | पत्नी सत्यभामा हीच्याशी असलेले संबंध |
| गुरुजने क्षमा | गुरु द्रोणाचार्य यांच्यासोबत आचरण |

**कथा - शठं प्रति शाठ्यम् - या संकेत स्थळावर उपलब्ध**

https://youtu.be/14PC6-Xq1ss

## सत्सङ्गतिः ।

**श्लोक क्र. ७**

**जाड्यं धियो हरति सिञ्चति वाचि सत्यम्**

**मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति ।**

**चेतः प्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिं**

**सत्सङ्गतिः कथय किं न करोति पुंसाम् ॥**

**अन्वय - सत्सङ्गतिः धियः जाड्यं हरति , वाचि सत्यं सिञ्चति , मान- उन्नतिं दिशति , पापम् अपाकरोति , चेतः प्रसादयति , दिक्षु कीर्तिं तनोति , सा पुंसां किं न करोति , कथय ।**

**अर्थ** - सज्जनांचा सहवास बुद्धीचा मंदपणा दूर करतो , वाणीत सत्यता आणतो , मान व उन्नती यांचा मार्ग दाखवतो ,पाप दूर करतो , मन प्रसन्न करतो आणि सर्व दिशात कीर्ती पसरवतो . सज्जनांचा सहवास माणसांचा कोणता फायदा करीत नाही ?

### समश्लोकी

**खरे वचन बोलवी , जडपणास की मालवी,**

**मान्नोनतिस डोलवी , दुरीत मारोनी चालवी,**

**मनी सुख अमोलवी , यश जगत्त्रयी कालवी ,**

**अनेक गुण पालवी , सुजन संगती झुलवी .**



# जिज्ञासापत्रम्

**समर्थी श्लोक -**

**महाजनस्य संसर्गः कस्य नोन्नतिकारकः |**
**पद्मपत्रस्थितं तोयं धत्ते मुक्ताफलश्रियम् ||**
**अर्थ** – महापुरुषांच्या सान्निध्यात कोणाची उन्नती होत नाही? ज्याप्रमाणे कमलाच्या पानावर पडलेला पाण्याचा थेंब सुद्धा मोत्याची शोभा धारण करतो .

**असज्जनः सज्जनसङ्गीसङ्गात् करोति दुःसाध्यमपीह साध्यम् |**
**पुष्पाश्रयात् शम्भुशिरोधिरूढा पिपीलिका चुम्बति चन्द्रबिम्बम् ||**
अर्थ – सज्जनांच्या सहवासात दुर्जन माणसांचे असाध्य काम सुद्धा साध्य होते. फुलाचा आधार घेऊन मुंगी शंकराच्या मस्तकावरील चंद्रबिम्बाचे चुंबन घेते .

**यापैकी कोणाची संगत धरुयात ?**

**१.कमी काळात पण चूकीच्या मार्गाने भरपूर फायदा करून देणारे**

**२.नेहमी अपकृत्यापासून दूर ठेवणारे**

**३.ज्यांच्या संगतीत राहून शांत आणि प्रसन्न वाटते**

**४.सद्य स्थितीत खूप चांगले वागणारे पण कधीही फसवणूक करू शकणारे**

**५.विनाकारण स्तुती करणारे स्तुतिपाठक**

**हा श्लोक कथांच्या माध्यमातून समजून घेण्यासाठी पुढील संकेतस्थळांना भेट द्या**

https://youtu.be/irs0tj-LOUk

https://youtu.be/KqPdSXjq4Pg

श्लोक क्र. ८

## प्रतिभासामर्थ्य

**जयन्ति ते सुकृतिनः रससिध्दाः कवीश्वराः |**

**नास्ति येषां यशःकाये जरामरणजं भयम् ||**

**अन्वय** – **येषां यशःकाये जरा-मरणजं भयं न अस्ति , ते रस-सिद्धाः सुकृतिनः कवीश्वराः जयन्ति ||**

**अर्थ -** ज्यांच्या कीर्तीरुपी शरीराला वार्धक्य आणि मरण यांचे भय नसते ते रसाविष्कारात पटाईत असलेले पुण्यशील कविश्रेष्ठ / श्रेष्ठ वैद्य उत्कर्ष पावतात .

## समश्लोकी

**जयांचे असे पुण्य की सावकाश,**

**विशेषे जगीं शोभती ते कवीश,**

**जायचा यशोदेह आकल्प राहे,**

**जरामृत्युवार्ता जयाला न साहे**



# जिज्ञासापत्रम् |

## श्लेष अलंकार

श्रीकृष्ण नवरा मी **नवरी**
शिशुपाल नवरा मी **न-वरी**

सूर्य उगवला **झाडीत ....**
झाडूवाली रस्ता **झाडीत...**
शिपाई गोळ्या **झाडीत...**
अन् वाघही तंगड्या **झाडीत...**
**- राम गणेश गडकरी**

**पृथुकार्तस्वरपात्रं भूषितनि:शेषपरिजनं देव |**
**विलसत्करेणुगहनं सम्प्रति सममावयो: सदनम् ||**

राजा आणि याचक यांच्यातील साम्यता एकाच श्लोकातून मांडली आहे .

**श्लेष शब्द** – **१. पृथुकार्तस्वरपात्र** – ( याचक ) -घर मुलांच्या रडण्याचे स्थान

( राजा ) – घर सोन्याच्या मोठ्या मोठ्या भांड्यांनी युक्त

२. **भूषितनि:शेषपरिजनम्** – ( याचक ) – ज्याचे कुटुंबीय जमिनीवर झोपतात

( राजा ) – ज्याच्या घर अलंकृत आहे आणि सेवक परिजन यांनी युक्त घर

३. **विलसत्करेणुगहनम् -** ( याचक ) – ज्या घरात सर्व ठिकाणी उंदरांनी खोदून खड्डे बनविले गेल्यामुळे धुळीने भरलेले

( राजा )- डूलणाऱ्या हत्तींनीनी युक्त

याचक राजाला म्हणतो - हे राजन , आपल्या दोघांचे घर समान आहे
**१.पृथुकार्तस्वरपात्र २. भूषितनि:शेषपरिजनम् ३. विलसत्करेणुगहनम् असे असल्यामुळे आपले घर समान आहे**

# काव्यातील नवरस




**दिलेल्या उदाहरणांतून संस्कृत श्रेष्ठ कवी आणि श्रेष्ठ वैद्य अशी विभागणी करा.**

चरक , कालिदास , भास , अश्विनकुमार , बाणभट्ट , सुश्रुत , वाग्भट , शूद्रक , धन्वंतरी ,वाल्मिकी , व्यास , नागार्जुन

**या श्लोकावर आधारीत नृत्य पहाण्यासाठी या संकेत स्थळाला भेट द्या .**

https://youtu.be/ZGhHM2we4ks

**उत्तरे**

**श्रेष्ठ कवी** – कालिदास , भास , बाणभट्ट , शूद्रक , वाल्मिकी , व्यास

**श्रेष्ठ वैद्य** – चरक , अश्विनकुमार , सुश्रुत , वाग्भट , धन्वंतरी , नागार्जुन

श्लोक क्र. ९

## उत्तमजनाः |

**प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः |**
**प्रारभ्य विघ्ननिहिता विरमन्ति मध्याः ||**
**विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः |**
**प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ||**

अन्वय – **विघ्नभयेन खलु नीचैः कार्यं न प्रारभ्यते | कार्यं प्रारभ्य विघ्नविहताः मध्याः न विरमन्ति | विघ्नैः पुनः पुनः प्रतिहन्यमानाः अपि उत्तमजनाः प्रारब्धं कार्यं न परित्यजन्ति ||**

अर्थ - अत्यन्त खालच्या दर्जाची माणसे संकटाच्या भीतीने कार्य सुरु करीत नाहीत .मध्यम प्रतीचे लोक कार्य सुरु करून मध्येच संकट आले असता कार्य सोडून देतात. परंतु संकटानी पुन्हा पुन्हा पराभूत केले तरी उत्तम प्रतीची माणसे एकदा सुरु केलेले कार्य सोडून देत नाहीत.

## समश्लोकी

**आरंभितातिखल विघ्नभये न येती, विघ्ने स्वकार्य तरि मध्यम सोडिताती**

**केले जरी बहुत जर्जर विघ्नघातें,प्रारब्ध उत्तमजनीं न विसंबिजे तें.**



# जिज्ञासापत्रम्

**पुढील तक्त्यात काही धैर्यशील व्यक्तींची नावे लपलेली आहेत , आडवी – तिरपी – सरळ मार्गाने शोधूयात त्यांना ..**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आ | इ | स्टा | ई | न | लिं |
| x | x | शि | x | सा | क |
| x | x | x | व | x | न |
| म | x | र | न | रा | x |
| द | क | रा | रें | णी | य |
| र | x | णा | द्र | ल | ए |
| ते | चा | प्र | मो | क्ष्मी | क |
| रे | र्ली | ता | दी | बा | ल |
| सा | x | प | x | ई | व्य |

**श्लोकावर आधारीत एक**

**संस्कृतकथा – भगीरथस्य प्रयत्न: - या संकेत स्थळावर उपलब्ध**

https://youtu.be/yFoCqBI9If8

छत्रपती शिवाजी महाराजः यदा औरंगजेब यवनशासकस्य कारागृहात प्रत्यागतवान्। तदा पुणेनगरस्य समीपस्थ कोंढाणा दुर्गं जेतुं नियोजनं अकरोत् तदा एव सरदार प्रमुखः तानाजी मालुसरे तत्र आगतः । तस्य रायबा पुत्रस्य विवाहः निश्चितः।

महाराजं निमन्त्रणाय तानाजी तत्र आगतः आसीत्। विवाहविषये अनभिज्ञा जिजामाता दुर्ग विषये कथयति। तानाजी उक्तवान् आधी लग्न कोंढाण्याचे मग माझ्या रायबाचे.

भयंकरे समाप्ते युद्धे दुर्गः जितः परंतु महापराक्रमी तानाजी मृतः।तानाजीसदृशैः बहुभिः सैनिकैः स्वप्राणाः राष्ट्रकार्यार्थं आहुताः यतः छत्रपतिः महाराजः स्वराज्यस्य प्रतिज्ञां पूर्णां कृत्वा क्षत्रियकुलावंतसः अभिषिक्तः राजा अभवत्।

तात्पर्यं _ राष्ट्रकार्यार्थं आरब्धं कार्यात् वीराः न विरमन्ति।

**उत्तरे** – आईनस्टाइन, लिंकन, शिवराय ,नरेंद्र मोदी, राणा प्रताप ,मदर तेरेसा, चार्ली, एकलव्य ,राणी लक्ष्मीबाई,सावरकर

श्लोक क्र. १०

## वृथा याचना

**रे रे चातक ! सावधानमनसा मित्र क्षणं श्रूयताम्**
**अम्भोदा बहवोऽपि सन्ति गगने सर्वेऽपि नैतादृशाः |**
**केचिद् वृष्टिभिरार्द्रयन्ति वसुधां गर्जन्ति केचिद् वृथा**
**यं यं पश्यसि तस्य तस्य पुरतो मा ब्रूहि दीनं वचः ||**

अन्वय – **रे रे चातक मित्र , सावधानमनसा क्षणं श्रूयताम् | बहवः अम्भोदाः गगने सन्ति | सर्वे अपि न एतादृशाः | केचित् वृष्टिभिः वसुधाम् आर्द्रयन्ति | केचित् वृथा गर्जन्ति | अतः यं यं मेघं पश्यसि तस्य तस्य पुरतः दीनं वचः मा ब्रूहि |**


अर्थ - अरे चातक मित्रा , क्षणभर लक्षपूर्वक मनाने जरा ऐक. आकाशात पुष्कळ ढग असतात.सर्वच ढग सारखे नसतात काही ढग पावसाने पृथ्वीला भिजवून टाकतात, तर काही केवळ फक्त गर्जना करतात. म्हणून जो जो ढग तू पाहशील त्याच्या समोर दीनवाणे पणाने बोलू (याचना) नकोस .

### समश्लोकी

**ऐकें चातक सावधान करुनि चित्ता सख्या वैखरी ,**
**आकाशी असती पयोद बहु तैसे सर्व नाही परी,**
**कांही वृष्टी करोनी पोषिति धरा कांही वृथा गर्जति,**
**ज्या ज्या पाहसि दिनभाषणिं नको प्रार्थूंच सर्वांप्रती**



# जिज्ञासापत्रम् ।



चातक पक्षी

- साधारण ३३ सेमी आकाराचा हा पक्षी पावसाळ्यात भारतात स्थलांतरित होतो.
- हा कोकीळ वर्गातीलच पक्षी असून हा कोकिळेप्रमाणे आपली अंडी दुसऱ्या पक्षांच्या घरट्यात घालतो
- **पियू पियू** असा आवाज काढत हा पक्षी जरी मेघांना साद घालत असला तरी **' तो फक्त पावसाचे पाणी पितो '** ही केवळ **कवि कल्पना** आहे , हा इतर पक्षांसारखा जमिनीवर साठलेले पाणीसुद्धा पितो.

**मेघ – पर्यायीवाचक शब्द**

**जलदः , पयोदः , अम्भोदः , जलधरः ।**

**श्लोक नृत्याच्या माध्यमातून समजून घेण्यासाठी पुढील संकेत स्थळाला भेट द्या .**

**https://youtu.be/cqVFo3bQhEk**

श्लोक क्र.११

## असिधाराव्रतम् |

**प्रदानं प्रच्छन्नं गृहमुपगते संभ्रमविधि: प्रियं कृत्वा मौनं सदसि कथनं चाप्युपकृते:।**

**अनुत्सेको लक्ष्म्यां निरभिभवसारा: परकथा: सतां केनोद्दिष्टं विषममसिधारा व्रतमिदम्।।**

**अन्वय-प्रच्छन्नं प्रदानम्,गृहम् उपगते संभ्रम-विधि:,प्रियं कृत्वा मौनम् ,उपकृते: सदसि कथनं च,लक्ष्म्याम् अनुत्सेक:,निरभिभवसारा: पर-कथा:,इदं विषमम् असिधारा व्रतं सतां केन उद्दिष्टम्?**

**अर्थ**- दान करून त्याविषयी गुप्तता ठेवणे, घरी आलेल्याचे त्वरेने स्वागत करणे, उपकार करून (त्या विषयी) मौन बाळगणे, तसेच (स्वतः वर इतरांनी केलेल्या) उपकाराचा चारचौघांत उल्लेख करणे, वैभव आले असता गर्व न वाहणे, इतरांविषयी बोलताना हिणवून न बोलणे,खरोखर सज्जनांना हे महाकठीण असिधाराव्रत कोणी बरे शिकवले असेल?

### समश्लोकी

**दे दान गुप्त,उपकार करी न बोले,**

**मानी प्रमोद जरी मान्य घरास आले**

**दावी न गर्व विभवे गुण घे पराचे,**

**खड्गाग्रतुल्य विषमव्रत हें भल्याचें.**



# जिज्ञासापत्रम् |

असिधाराव्रतम् -तलवारीच्या तीक्ष्णाग्रावर चालण्याप्रमाणे अवघड असलेले व्रत.

अतिथी देवो भव |

दानाचे प्रकार

↓

सात्विक

↓

राजस

↓

तामस

( संदर्भ-श्रीमद्भगवद्गीता )

श्लोक क्र.१२

## परोपकारः |

**श्रोत्रं श्रुतेनैव न कुण्डलेन, दानेन पाणिर्न तु कड्‌कणेन।**
**विभाति कायः करुणापराणां, परोपकारैर्न तु चन्दनेन।।**

**अन्वय-श्रोत्रं श्रुतेन एव , न कुण्डलेन , पाणि दानेन , कड्‌कणेन तु न , कायः  परोपकारै :,न चन्दनेन, विभाति |**

**अर्थ**–कनवाळू माणसांचे कान शास्त्रश्रवणानेच शोभून दिसतात , कर्णआभूषणांनी नाही.  हात दानाने शोभून दिसतात,कंकणांनी नाही .शरीर परोपकाराने शोभून दिसते .चंदनलेपनाने नाही.

### समश्लोकी

**श्रुतेंचि की श्रोत्र न कुंडलाने ,**

**दानेंचि की पाणि न कंकणाने ,**

**साजे तसा देहहि हा न आने,**

**परोपकारेचि न चंदनाने**



# जिज्ञासापत्रम् ।

**समर्थी सुभाषित -**

हस्तस्य भूषणं दानं सत्यं कण्ठस्य भूषणम् ।

श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं भूषणैः किं प्रयोजनम् ।।

**अर्थ -** सत्पात्री दान देणे हाताचे भूषण आहे , सत्य बोलणे हे कंठाचे भूषण आहे , शास्त्रश्रवण हे  कानांचे भूषण आहे .( ही भूषणे असताना ) इतर भूषणांचे प्रयोजन काय ?

**समर्थी वचने -**

- परं परोपकाराय यो जीवति स जीवति ।

(परोपकारासाठी जो जगतो तोच खऱ्या अर्थाने आयुष्य जगतो.)

- परोपकारशून्यस्य धिक् मनुष्यस्य जीवनम् ।

(परोपकार न करणाऱ्या माणसाच्या आयुष्याचा धिक्कार असो.)

-परोपकाराय सतां विभूतय: ।

( सज्जनांच्या विभूती परोपकारासाठी असतात.)

हा श्लोक नृत्याच्या माध्यमातून अधिक समजून घेण्यासाठी या संकेतस्थळाला भेट दया.

https://www.youtube.com/watch?v=sz7L4toba4o

श्लोक क्र.१३

## सन्मित्रलक्षणम् |

**पापान्निवारयति योजयते हिताय गुह्यं निगूहति गुणान् प्रकटीकरोति |**

**आपद्गतं च न जहाति ददाति काले सन्मित्रलक्षणमिदं प्रवदन्ति सन्त :||**

**अन्वय – पापात् निवारयति , हिताय योजयते , गुह्यं निगूहति , गुणान् प्रकटीकरोति , आपद्गतं न जहाति , काले ददाति च , सन्त: इदं सन्मित्रलक्षणं प्रवदन्ति |**

**अर्थ-** पापकर्म करण्यापासून अडवतो ,हिताचरण करण्यास प्रवृत्त करतो , गोपनीय गोष्टी गुप्त ठेवतो , गुण प्रकट करतो, संकटकाळीसुद्धा साथ सोडत नाही आणि गरजेच्या वेळी मदत करतो .सज्जनांनी ही चांगल्या मित्रांची सहा लक्षणे सांगितलेली आहेत.

### समश्लोकी


**योजी हिताप्रति निवारूनि पापकर्मे वर्णी बरेच गुण झाकुनिंया,कुकर्मे,**

**दे आपणांस सन्मित्रलक्षण असें वदताति जाणा,असतां व्यसनीं त्यजीना ,**



# जिज्ञासापत्रम् |

**श्लोकातील सन्मित्रलक्षणे लिहून आकृती पूर्ण करा.**




{उत्तरे -पापात् निवारयति , हिताय योजयते , गुह्यं निगूहति , गुणान् प्रकटीकरोति , आपद्गतं न जहाति, काले ददाति }

श्लोक क्र.१४

## मित्रता |

**क्षीरेणात्मगतोदकाय हि गुणा दत्तापुरा ते ऽखिला:**

**क्षीरोत्तापमवेक्ष्य तेन पयसा स्वात्मा कृशानौ हुत :|**

**गन्तुं पावकमुन्मनस्तदभवद् दृष्ट्वा तु मित्रापदं**

**युक्तं तेन जलेन शाम्यति सतां मैत्री पुनस्त्वीदृशी ||**

**अन्वय- पुरा क्षीरेण आत्मगत-उदकाय ते अखिला: गुणा: दत्ता: हि | क्षीर उत्तापम् अवेक्ष्य तेन पयसा स्वात्मा कृशानौ हुत: |मित्र-आपदं तु दृष्ट्वा तत् पावकं गन्तुम् उन्मन: अभवत् | तेन जलेन युक्तं पुन: शाम्यति | सतां मैत्री तु ईदृशी |**

**अर्थ -**आपल्याशी एकरूप झालेल्या पाण्याला दूधाने ते सर्व गुणधर्म पूर्वीच देऊन टाकले दूधाला झालेला ताप पाहताच . .ची आहुती अग्नीत दिली:त्या उदकाने स्वतपरंतु मित्रावरील ते संकट पाहताच ते (दूध) अग्नीत प्रवेश करण्यास उत्कंठित झाले.त्याच पाण्याशी त्याचा संयोग होताच ते पुन्हा शांत होते. सज्जनांची मैत्री अशीच असते.

### समश्लोकी

**क्षीराने दिधले स्वकीय गुणही नीरास आत्मश्रये ;त्या क्षीरास हुताशनें श्रमवितां तें तोय मेले स्वये ,**

**झाला ताप विशिष्ट अग्निवदनीं तें दुग्ध जेंव्हा पडेतेंव्हा, धावुनि तोय शीतल करी मित्रत्व हें चोखडें**

**.**



# जिज्ञासापत्रम् |

## समर्थी श्लोक

करावोव शरीरस्य नेत्रयोरिव पक्ष्मणी |

अप्रोक्तमपि कुर्वन्ति तन्मित्रं मित्रलक्षणम् ||

{अर्थ -देहाचे काम जसे हात ,डोळ्यांचे रक्षण जसे पापण्या ,या न सांगता करतात , तसेच मित्रकार्य न सांगता करणारा तो मित्र व तसे करणे हे मित्रलक्षण .}

निसर्गात दिसणारी मैत्री शोधूया.

उदा.- चंद्र आणि चांदण्या

प्रसिद्धमैत्रम् ।

कृष्ण - सुदामा

लो.टिळक - आगरकर

दुर्योधन - कर्ण

शकुंतला -प्रियंवदा

श्लोक क्र.१५

## गुणभूषणानि |

**ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता शौर्यस्य वाक्संयमः**

**ज्ञानस्योपशमः श्रुतस्य  विनयो वित्तस्य पात्रे व्ययः |**

**अक्रोधस्तपसः  क्षमा प्रभवितुर्धर्मस्य निर्व्याजता**

**सर्वेषामपि सर्वकारणमिदं शीलं परं भूषणम् ||**

**अन्वय- सुजनता ऐश्वर्यस्य विभूषणं , वाक्संयमः शौर्यस्य , ज्ञानस्य उपशमः ,श्रुतस्य विनयः , पात्रे वित्तस्य व्ययः, तपसः अक्रोधः , प्रभवितुः क्षमा , धर्मस्य निर्व्याजता , इदं  सर्वेषामपि कारणं शीलं परं भूषणम् |**

**अर्थ -** सुजनता हा वैभवाचा , वाणीवरील संयम हा पराक्रमाचा , शांतता हा ज्ञानाचा , नम्रता हा शास्त्रज्ञानाचा ,सत्पात्री दान हा द्रव्याचा, क्रोधराहित्य हा तपाचा ,क्षमाशीलता हा सामर्थ्याचा , निष्कपटता हा धर्माचा अलंकार आहे. या सर्वांचे सर्वस्वाने कारण असे शील हे सर्वश्रेष्ठ आभूषण होय .

## समश्लोकी

**भाग्याला सुजनत्व भूषण असे की मौन शौर्यास ते, ,ज्ञानाला शम त्या शमास विनय द्रव्यास दातृत्व ते,**

**अक्रोधत्व तपा क्षमा प्रभुपणा धर्मास निर्दंभता, ,या सर्वांसहि मुख्य भूषणपहा सच्छील हे तत्वता.**



# जिज्ञासापत्रम् |

१.कोणाचे कोणते गुण आहेत ते ओळखा.

| | |
|---|---|
| अ.ऐश्वर्यम् + सुजनता | क.प्रभू श्रीराम |
| आ.श्रुतम् + विनय: | ख.सुधा मूर्ती |
| इ.वित्तम् + पात्रे व्यय: | ग.रतन टाटा |
| ई.शौर्यम् + वाक्संयम: | घ.स्वामी विवेकानंद |

२.षष्ठी विभक्तीची पदे शोधा.

वित्तस्य

ज्ञानस्य धर्मस्य सुजनता

शौर्यस्य व्यय:

तपस: विभूषणम्

{उत्तरे -१. -अ-ख, आ-घ ,इ-ग ,ई-क } {उत्तरे -२-वित्तस्य ,शौर्यस्य,धर्मस्य,तपस:, ज्ञानस्य }

श्लोक क्र.१६

## सुधीरा: |

**निन्दन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु**

**लक्ष्मी: समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् |**

**अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा**

**न्याय्यात्पथ: प्रविचलन्ति पदं न धीरा: ||**

**अन्वय - नीतिनिपुणा निन्दन्तु यदि वा स्तुवन्तु :, लक्ष्मी समाविशतु :, यथा इष्टं गच्छतु , मरणम् अद्य एव वा अस्तु , युगान्तरे वा ,धीरा: न्याय्यात् पथ: पदं न प्रविचलन्ति ।**

**अर्थ**- नीतिपारंगत लोकांनी स्तुती करो अथवा निंदा , लक्ष्मी येवो किंवा तिच्या इच्छेनुसार जावो , मरण आज येवो किंवा काही युगांनी , श्रेष्ठ लोक न्याय्य मार्गापासून कधीही ढळत नाहीत.

## समश्लोकी


**वानोत निंदोत सुनीतिमंत, चळो,असो वा कमला गृहांत ,**


**हो मृत्यु आजीच ,घडो युगांती , सन्मार्ग टाकूनि भले न जाती.**



# जिज्ञासापत्रम् |

**कोणत्याही संकटांना न घाबरता कार्यपूर्ती करणारी ही प्रसिद्ध व्यक्तिमत्वे कोण आहेत ?**








१ ) ------------------------ २) ----------------------- ३) ----------------------

**सुधीरांचे (बुद्धिमानांचे) गुण सांगणारे सुभाषित-**

शुश्रुषा श्रवणं चैव ग्रहणं धारणं तथा |
ऊहापोहोऽर्थ विज्ञानं तत्त्वज्ञानं च धीगुणाः||




{उत्तरे-१.महर्षी कर्वे २.डॉ.बाबा आमटे ३.सावित्रीबाई व जोतिबा फुले }

**श्लोक क्र.१७**

## धैर्यवृत्तिः |

**कदर्थितस्यापि हि धैर्यवृत्ते**

**र्न शक्यते धैर्यगुणः प्रमार्ष्टुम्।**

**अधोमुखस्यापि कृतस्य वह्ने**

**र्नाधः शिखा यान्ति कदाचिदेव।।**

**अन्वय-कदर्थितस्यापि हि धैर्य-वृत्तेः पुरुषस्य धैर्य-गुणं प्रमार्ष्टुं न हि शक्यते। अधो मुखस्यापि कृतस्य अपि वह्नेः शिखाः कदाचित् एव अधः न यान्ति।**

**अर्थ -** तिरस्कृत झालेल्या धैर्यवान पुरुषाचा धैर्य गुण हा नाहीसा करणे शक्य होत नाहीजसे खाली तोंड केलेल्या . अग्निच्या ज्वालासुद्धा कधीही खाली जात नाहीत.

### समश्लोकी

**आली जरी कष्टदशा अपार ,**

**न टाकिती धैर्य तथापि धीर ,**

**केली तरी ज्योत बळेच खाले,**

**ज्वाळा तरी ते वरती उफाळे**



# जिज्ञासापत्रम् |

कदर्थः शब्दाची व्युत्पत्ती

↓

कुत्सितः अर्थः कदर्थः।

(क.भू.धा.वि)

**प्रहेलिका**

औष्ण्ययुक्तोऽतितेजस्वीहेमन्ते शैत्यनाशकः।

प्रसन्नः पाचयाम्यन्नंदहामि कुपितो यदि॥

'वह्नि' या शब्दाचे पर्यायवाची शब्द-




प्रहेलिकेचे उत्तर - अग्निः |

श्लोक क्र.१८

## परोपकारप्रशंसा |

**भवन्ति नम्रास्तरव: फलोद्गमै:**

**नवाम्बुभिर्भूरिविलम्बिनो घना:।**

**अनुद्धता: सत्पुरुषा: समृद्धिभि:**

**स्वभाव एवैष परोपकारिणाम्।।**

**अन्वय - तरवः फल उद्गमै: नम्रा: भवन्ति,घना: दूर नव अम्बुभि : विलम्बिन:,सत् पुरुषा : अनुद्धता :समृद्धिभि : एष: परोपकारिणां स्वभाव: एव |**

**अर्थ** -वृक्ष फळांच्या भारांनी वाकतात. मेघ नवीन पाण्याने खूप खाली झुकतात. सज्जन ऐश्वर्याने विनयशील होतात. कारण दुस-यांवर उपकार करणाऱ्यांचा हा स्वभावच असतो.


### समश्लोकी

**वृक्ष फार लवती फलभारे ,**

**लोंबती जलद घेउनी नीरे ,**

**थोर गर्व न धरी विभवाचा ,**

**हा स्वभाव उपकारपरांचा.**



# जिज्ञासापत्रम् |

## समर्थी श्लोक

परोपकाराय फलन्ति वृक्षा:

परोपकाराय वहन्ति नद्य:।

परोपकाराय दुहन्ति गाव:

परोपकारार्थमिदं शरीरम्।।

अर्थ - वृक्ष परोपकारासाठीच फळे देतात,
नद्या परोपकारासाठीच वाहतात,

परोपकारासाठीच गाई दूध देतात,
परोपकारासाठीच हे शरीर आहे.

**परोपकार करणाऱ्या व्यक्तींची नावे गटानुसार लिहा.**

| क्रांतिकारक | समाजसुधारक | संत | उद्योजक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**कथामाध्यमातून श्लोकार्थ अधिक समजून घेण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा.**

**कथेची लिंक -** https://www.youtube.com/watch?v=cqoRLyTddSg

श्लोक क्र.१९

## पूर्वसंचितः |

**नैवाकृतिः फलति नैव कुलं न शीलं**

**विद्यापि नैव न च यत्नकृतापि सेवा।**

**भाग्यानि पूर्वतपसा खलु संचितानि**

**काले फलन्ति पुरुषस्य यथैव वृक्षाः॥**

**अन्वय - आकृतिः,कुलं,शीलं,विद्या च यत्नकृता सेवा अपि नैव फलति। पूर्वतपसा संचितानि पुरुषस्य भाग्यानि एव फलन्ति खलु यथा वृक्षाः |**

**अर्थ -**उत्तम रूप, कूळ, चारित्र्य, विद्या आणि प्रयत्नपूर्वक केलेली सेवा सुद्धा मुळीच फलदायी होत नाही. कारण पूर्वी केलेल्या पुण्यामुळे मनुष्याचे भाग्य योग्य काळ येताच वृक्षाप्रमाणे खरोखरच फलदायी होते.

## समश्लोकी

**विद्या सुरूप कुल सेवन शील पाही ,**

**त्यांचे गुण किमपि कांचनलब्धि नाही ,**

**ते पूर्वपुण्य समयींच फळे नराला ,**

**काळीं जसे फळ घडे धरणीरूहांला.**




# जिज्ञासापत्रम् |

संचित म्हणजे धर्मशास्त्रानुसार पूर्वजन्मातील कर्मानुसार मनुष्याचे भाग्य निश्चित केले जाते

**पूर्वसंचित प्राप्त व्यक्ती**

१)संत ज्ञानेश्वर

२)समर्थ रामदास




**समर्थी श्लोक**

भीमं वनं भवति तस्य पुरं प्रधानंसर्वो जन: स्वजनतामुपयाति तस्य।

कृत्स्ना च भूर्भवति सन्निधिरत्नपूर्णायस्यास्ति पूर्वसुकृतं विपुलं नरस्य।।

{अर्थ - ज्या पुरुषाची पूर्वपुण्याई अलोट आहे त्याला भीषण अरण्य हे महान् नगर बनते, सर्व माणसे नातेवाईक होतात आणि समग्र पृथ्वी उत्कृष्ट रत्नांनी भरून जाते. }

श्लोक क्र.२०

## उद्यमप्रशंसा |

**आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महान् रिपुः।**

**नास्त्युद्यसमो बन्धुः कृत्वा यं नावसीदति।।**

**अन्वय- आलस्यं मनुष्याणां शरीरस्थो महान् रिपुः अस्ति।उद्यमसमः बन्धुः नास्ति।यतः उदयमं कुर्वाणो न अवसीदति।।**

**अर्थ -**आळस हा मुष्याच्या शरीरात राहणारा मोठा शत्रू आहे,उद्योगासारखा तर दुसरा बांधव नाही. कारण उद्योग करणाऱ्यास काहीतरी फळ मिळाल्यावाचून राहत नाही.

### समर्थी श्लोक

**आलस्य जे कार्य विघातकारी ,**

**असो नये तो रिपु या शरीरीं,**

**उद्योग सद्बंधु तया टाकी ,**

**त्या सेविता  पावसि सौख्य लोकीं .**



# जिज्ञासापत्रम् |


## समर्थी श्लोक

**अलसस्य कुतः विद्या अविद्यस्य कुतः धनम्।**

**अधनस्य कुतः मित्रम् अमित्रस्य कुतः सुखम्।।**

**अर्थ : आळशी माणसाला विद्या कुठून मिळणार, मूर्ख माणसाला धन कुठून मिळणार, निर्धनाला मित्र आणि मित्र नसलेल्याला सुख कुठून मिळणार?**

## माणसाचे सहा अंतस्थ शत्रू -




**गीतम् ।**

**मनसा सततं स्मरणीयम्**
**वचसा सततं वदनीयम्**
**लोकहितं मम करणीयम् ॥**
**लोकहितं॥**
**न भोगभवने रमणीयम्**
**न च सुखशयने शयनीयनम्**
**अहर्निशं जागरणीयम्**
**लोकहितं मम करणीयम् ॥**
**मनसा॥**

**नृत्य व कथा माध्यमातून श्लोक अधिक जाणून घेण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा.**

**नृत्य -** https://www.youtube.com/watch?v=Sc4rDzQsuqg

**कथा -**https://www.youtube.com/watch?v=tS-PoqGd-2k

श्लोक क्र.२१

## प्रतिज्ञामहती |

**लज्जागुणौघजननीं जननीमिवार्याम्**

**अत्यन्तशुद्धहृदया अनुवर्तमानाः।**

**तेजस्विनः सुखमसूनपि संत्यजन्ति**

**सत्यव्रतव्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम्।।**

**अन्वय - गुणजननीम्-ओघ-,आर्याम्,अत्यन्तहृदयां-शुद्ध- लज्जां जननीम् इव अनुवर्तमानाः, सत्य व्रत व्यसनिनतेजस्विनः असून् अपि सुखं : संत्यजन्ति,प्रतिज्ञां पुनः न |**

**अर्थ -**अनेक गुण उत्पन्न करणाऱ्या पूज्य मातेप्रमाणे असणाऱ्या विनयाचा अवलंब करणारे,अतिशय शुद्ध अंतःकरणाचे व सत्याचे व्रत एकनिष्ठेने पाळणारे स्वाभिमानी लोक प्राणसुद्धा सुखाने देतात, परंतु प्रतिज्ञा सोडून देत नाही.

## समश्लोकी

**लज्जारूप गुणांप्रती प्रसविती माताच की आपुली,**

**जीचे स्वांत विशुद्ध फारची असे, जी का बहू चांगली,**


**तेजस्वी जन जे मोडिति कदा ऐशा प्रतिज्ञेसि ते,**


**त्याच्या व्रतपालनी सदा सुखे असु त्यागीते.**



## जिज्ञासापत्रम् |

### प्रतिज्ञित व्यक्ती -




वर दिलेल्या उदाहरणांप्रमाणे प्रतिज्ञित व्यक्तींची आणखी उदाहरणे शोधूया.

# आचार्य भर्तृहरीस पत्र



**प्रति ,**

**प्रिय महाकवी भर्तृहरीस...**

**जीवनाचे भाष्यकार असलेल्या तुला आम्हा सर्व विद्यार्थ्यांकडून सादर प्रणाम.** मागील सहा आठवड्यांपासून आम्ही सर्व विद्यार्थी तुम्हाला अधिकाधिक जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहोत आणि या शेवटच्या आठवड्यात तर आम्हा सर्वांचे सगळ्यात आवडते कवी आपण झाला आहात. अर्थात कारण एकच आहे, आपण निर्मिलेली कलाकृती **'नीतिशतक'.** आपल्या या श्लोकांमधून जीवनाकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन आम्ही शिकलो. ते आपल्या समोर मांडत आहोत.

**प्रथमेशला** दिक्कालाद्यनवच्छीन्ना ...ह्या श्लोकातून असे समजले ,दिशा आणि काळाच्या पलीकडे असलेले चैतन्याचे स्वरूप संपूर्ण ब्रम्हांडात किती व्यापलेले आहे म्हणून मी या चैतन्यासमोर नतमस्तक आहे.

**सुबोधला** पापान्निवारयति.... हा श्लोक खूप आवडला. त्याला असे समजले की मैत्रीची पारख कशी करावी! चांगला मित्र म्हणजे बाईक वरून फिरणारा, खायला देणारा नाही. मीत्र आपल्याला चांगले काम करण्यास प्रवृत्त करणारा, आपले चांगले गुण बघणारा, वाईट गुण दूर करणारा हा खरा मित्र असतो.

अम्भोजिनी.... हा श्लोक समजून घेताना **सिद्धी** म्हणते माझ्या अंगी रुजवले चांगले गुण माझ्यापासून कोणीही काढून घेऊ शकत नाही हे मला नीतिशतकाने शिकवले.

आपल्यावर एखादं संकट आलं, कामात विघ्न आले तरीसुद्धा सुरू केलेले काम कधीही थांबवायचे नाही असे **मानसी** 'प्रारभ्यते न खलु....' या श्लोकातून शिकली.

**कल्पना** म्हणते 'भवन्ति नम्रास्तरवः...' हा श्लोक आपल्या अंगी नेहमी परोपकारी वृत्ती असली पाहिजे ,आपण नेहमी इतरांचे चांगले केले की आपलेही चांगलेच होते असा स्वभाव मी बनवणार.

**आदित्य** म्हणतो नेहमी चांगले गुण अंगी बाळगण्याचा ध्यास घ्यायला हवा.

**नेहा** म्हणते आपण केलेल्या प्रतिज्ञेशी आपण एकनिष्ठ राहायला पाहिजे .प्रबोधिनीत आम्हालाही देशसेवेची प्रतिज्ञा घेण्यास सांगितले जाते ,भर्तृहरी तुझ्या या' लज्जागुणौघजननी...' या श्लोकातून ही प्रतिज्ञा मी कायमस्वरूपी पाळीन.

'आलस्यं हि...' हा श्लोक समजून घेतल्यावर मनुष्याचा सगळ्यात मोठा शत्रू आळस आहे म्हणून यापुढे मी कधीही आळस करणार नाही असे **अथर्व** म्हणतो.

'केयूरा न विभूषयन्ति...' ह्या श्लोकावर **अंतरा** म्हणते आपण वेगवेगळ्या अलंकारांनी सुंदर दिसत नाही ही तर आपल्या अंगी असलेल्या विचारांनी संस्कारांनी वाणीमुळे सुंदर दिसतो म्हणून यापुढे मी माझे वाग्भूषण वाढवण्याचा प्रयत्न करेन.

**श्रेयस** म्हणतो जीवनात कितीही अडचणी आल्या तरी जीवन जगताना 'कदर्थितस्यापि...' या या श्लोकाचा दृष्टांत मी कधीही विसरणार नाही.

हे भर्तृहरी, काही दिवसातच आमचे अभिरुचीचे तास आता संपतील... पण या काळात शिकलेले श्लोक आम्हाला कायमस्वरूपी आठवतील. याच श्लोकांच्या माध्यमातून तुम्ही नेहमी आमच्याजवळ राहाल.

आपल्याला शतशः प्रणाम....

**अभिरुची गटातील विद्यार्थी - श्लोक सादरीकरण**

**https://youtu.be/Owqjv4x5EtI**

# पालक अभिप्राय

ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय ही शाळा प्रत्येक वेळी नवनवीन उपक्रम राबवत असते. या वेळी ही नितीशतक हा उपक्रम राबवण्यात आला. या नितीशतकामध्ये एकूण शंभर श्लोक आहेत, त्या पैकी अभ्यासासाठी 29 श्लोक शिकवले गेले. अगदी चार ओळीच्या श्लोकामधून सुद्धा आयुष्य माणसाने कसे जगावे हे समजते.

हे श्लोक माझी पाल्य शिकत असताना आमच्या घरातील वातावरण हे संस्कृतमय झाले. यामुळे माझ्या पाल्याच्या वागण्या-बोलण्यामध्ये बरीच सुधारणा झालेली आहे. एक श्लोक शिकून झाल्यावर ती आम्हाला त्या श्लोकांचा अर्थ समजावून सांगत होती, यामुळे आम्हाला ही संस्कृत विषयाची आवड निर्माण झाली, श्लोक पाठांतर केल्यामुळे तिचे उच्चार अधिकाधिक स्पष्ट झाले. जेव्हा जेव्हा ती श्लोक म्हणत असे तेव्हा तेव्हा घरातील वातावरण प्रसन्न होत असे आणि आम्हालाही ते ऐकण्याची आवड निर्माण झाली. तिच्या पाठांतरामुळे ते ऐकून तिचा लहान भाऊ यालाही काही श्लोक पाठ झाले आहेत. असे उपक्रम शाळा राबवत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांमध्ये हे बदल दिसत आहेत.

धन्यवाद ...

सौ. अर्चना विठ्ठल मर्दाने

॥ श्री ॥

नमस्कार,

नवनवीन विचार कल्पना संकल्पना प्रत्यक्ष कृतीत आणणे म्हणजेच ज्ञानप्रबोधिनी. अशीच एक 'अभिरुची' नावाची अभिनव संकल्पना ऑगस्ट नववर्षाच्या सुरुवातीला शाळेने इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसमोर मांडली. जे रुचते ते अधिक चांगल्याप्रकारे रुजवण्याची ही कल्पना. क्रमिक पुस्तकाव्यतिरिक्त एखादा विषय कसा समजून घ्यायचा, तो कसा आत्मसात करायचा, हे आमच्या लेकीच्या संस्कृत विषयाच्या अध्यापकांनी मुलांना दैनंदिन व्यवहारातले दाखले देत भर्तृहरि लिखित 'नीतीशतकम्-जगण्याची कला' या साहित्याची रुची वाढवण्यास सुरुवात केली. आज त्याची सांगता होणार असे नेहाने सांगितले.

एक पालक म्हणुन हा दीड-दोन महिन्यांचा प्रवास अगदी जवळून अनुभवण्याचा योग आला. नेहाचे नियमित होणारे अभिरुचीचे तास, त्यांच्या बैठका, गटांमधील मुलींच्या होत असलेल्या गटकार्य, त्यासाठी सुरु असलेल नियोजन, त्याद्वारे प्रत्यक्षात होत असलेली कृती हे अगदी तिच्याशी नकळत तिच्यात रुजत चाललय असं जाणवलं जणूकाही मीही या अभिरुची वर्गाचा प्रवास केला. कठीण वाटणाऱ्या गोष्टी शिक्षकांनी मुलांना सोप्या पद्धतीने कशा करता येतील याचे वेळोवेळी मार्गदर्शन केले. विद्यार्थी आणि शिक्षक या अभिरुची वर्गात सतत कार्यरत असलेले जाणवले.

संस्कृत साहित्य अशाप्रकारे शिकण्याचा नेहाचा हा पहिलाच प्रसंग होता. कृतीयुक्त अभ्यास असल्यामुळे तिनेही यात रस घेतला. संस्कृतच्या अध्यापिका सरिता ताई, स्नेहल ताई, प्राजक्ता ताई, सोनारसर तसेच नृत्याच्या गुरु गौरीताई यांच्या मार्गदर्शनामुळे छान अनुभवांची शिदोरी गाठीशी बांधली गेली. तिचा आत्मविश्वास दुणावल्याचेही जाणवले.

जशी लोकरीची लड उलगडली तशीच श्लोकांची एक एक ओळ ताईंनी मुलांना उलगडून सांगितली. जगण्याची कला शिकवणाऱ्या साहित्याचे अंगभूत कलेद्वारे सादरीकरण करण्यास प्रोत्साहन दिले. आणि आज त्याला मूर्तरूप प्राप्त झाले.

पालक

(सौ. विद्या जितेंद्र गोखले)

## अभिप्राय

यावर्षी आपल्या शाळेत अभिरुची वर्ग साजरे करण्यात आले. प्रत्येकाला आपल्या आवडीचा विषय निवडायचा होता. तर अंतराने या वेळी संस्कृत हा विषय निवडला. आम्हाला खूप विशेष वाटलं की तिने संस्कृत विषय निवडला. तस संस्कृतशी आमचा खूप संबंध नव्हता, घरात आम्हाला कोणालाही संस्कृत येत नाही, तरी अंतराने संस्कृत विषय निवडला त्यामुळे आनंद पण झाला. काहीतरी नविन शिकायला मिळणार होत.

एक दिवशी अंतरा शाळेतून घरी आली आणि तिने सांगितले की तारेनी आम्हाला नितिशतकम् या पुस्तकातील काही श्लोक आहेत त्या विषयावर आम्हाला प्रकल्प करायचा आहे. विषय पण नविन होता आणि त्याचे जे सादरीकरण करायचे होते ते पण खूप छान ठरवले. मुलांमधील गुणांना ओळखून त्यांच्याकडून तसे काम करून घेतले. सगळ्यांच्या कलेला उत्तम वाव मिळाला. शिक्षकांनी खूप मेहनत घेऊन मुलांकडून सगळं करून घेतल. आणि मुलांनीही तितक्याच आनंदाने सगळ केले.

शिक्षकांचे मनापासून खूप खूप धन्यवाद. खूप वेगळं देण्याचा प्रयत्न नेहमीच करीत असतात.

अंतराचे संस्कृत खूप छान झाले आहे. खूप अभिमान वाटतो. नितिशतकम् मध्ये जे श्लोक आहेत त्याचा अर्थ तिला खूप छान समजला. घरात तिने आम्हाला पण समजावून सांगितला. तिचे उच्चार सुधारले. तिला एकत्र काम कसे करायचे ते समजले.

असेच ज्ञान आणि नवनाविन्य प्रकल्प मुलांनी करावे. शिक्षकांचे सहकार्य मुलांना कायम मिळतच असते. शाळा मुलांना तसेच मुलांसोबत आम्हां-पालकांनाही भरभरून देत असते.

शिक्षकांचे आणि शाळेचे मनापासून खूप खूप धन्यवाद.

पल्लवी खैरनार

नमो नमः।

सर्व शिक्षकांचे व विद्यालयाचे मनापासून आभार. शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट नसलेले परंतु जीवनदायी शिक्षण प्रदान करण्यासाठी आपण श्री भर्तृहरी यांचे नितीशतक निवडले याचा मनापासून आनंद झाला.

आपण निवडलेला विषय पाहून मी अद्वैतला अभिरुची साठी संस्कृत विषय घे असे सुचविले. मला स्वतःला पाठांतराची आवड असल्याने मी सुद्धा काहीवेळेस आपल्या वर्गाला उपस्थित होते. लॉकडाऊन व online शिक्षणाचा मलाही फायदा झाला.

श्लोकांवरून कथा लिहा हा उपक्रम विशेष भावला. भारतीय तत्वज्ञान इतके समृद्ध आहे की आपल्याला हा अभिरुचीचा वर्ग ह्या प्रकल्पापुरता मर्यादित न ठेवता सदैव चालू राहील असा प्रयत्न नक्की करूयात. मला मदत करायला नक्की आवडेल.

— सौ. प्रतिभा जोशी दलाल.

ता. क. माझा पाल्य चि. अद्वैत दलाल, ५वी इ्मा ह्या वर्गास होता.



# विशेष अभिप्राय

**'नीतिशतकम्' अर्थात जगण्याची एक कला, हे संस्कृत अभिरुची प्रकल्पांतर्गत अध्यापक आणि विद्यार्थी यांनी अभ्यास करून संकलित केलेले पुस्तक म्हणजे नवनगर विद्यालयाच्या शैक्षणिक प्रयोगातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.** शिक्षण हे जीवन उपयोगी आणि आनंददायी असले पाहिजे. शिक्षण म्हणजे परीक्षांची तयारी नव्हे. हा प्रकल्प म्हणजे अशा आनंददायी शिक्षणाचा एक आदर्श नमुना आहे. मूळात काय शिकवले पाहिजे? याबद्दलची अध्यापकांची निवड अतिशय सार्थ आहे. भारतीय संस्कृतीतील ज्या वैदिक वाङमयातील तत्वज्ञानामुळे आमची संस्कृती हजारो वर्ष टिकलेली आहे, त्याचा परिचय विद्यार्थ्यांना या प्रकल्पातून अध्यापकांनी घडवून दिला. याबद्दल त्या सर्व अध्यापकांचे मनापासून कौतुक आहे.

**सध्या घडीच्या शिक्षण शास्त्रात ज्ञानरचनावाद मांडला गेला आहे. हे पुस्तक निर्मिती हे त्याचाही एक उत्तम नमुना ठरते**. दोन महिन्यात आणि तेही लॉकडाऊनच्या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने अशा पद्धतीने विद्यार्थ्यांनी-अध्यापकांनी केलेले काम हे कौतुकास्पद आहे. सर्व विद्यार्थ्यांचे आणि अध्यापकांचे मनःपूर्वक अभिनंदन !

मात्र हेही लक्षात ठेवूयात आहे की, ही सुरुवात आहे, नमुना आहे. यातून भारतीय वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासाची गोडी लागली आहे, ती टिकवून ठेवणेही महत्त्वाचे आहे. परीक्षेसाठी नसताना खऱ्या ज्ञानाच्या आनंदाने तुम्ही केलेला हा अभ्यास महत्त्वाचा आहे. असा अभ्यास हा नित्याचा भाग व्हायला पाहिजे, ते खरे शिक्षण ! अशा शिक्षणाची **' रुची वाढत राहो '** याकरिता खूप खूप शुभेच्छा !!!

**मा. श्री. मनोजराव देवळेकर**
**( केंद्र प्रमुख )**
**ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय , निगडी ,पुणे .**

# विशेष अभिप्राय

नीतिशतकम् E book ची निर्मिती करताना थोर व्यक्तींची चित्रे, कथा, प्रसंग, उदाहरणे, संकेतस्थळ, संदर्भ अशा अनेक घटकांचा योग्य ठिकाणी विचारपूर्वक समावेश केलेला आहे. हे सर्व करत असताना विद्यार्थी, पालक आणि अध्यापक यांचा सहभाग मिळविण्याचा आणि सहभागी होण्यासाठी उत्साह वाढविण्याचा आपण कल्पकतेने प्रयत्न केल्याचे जाणवते.

या निमित्ताने आपण तंत्रज्ञानाला आपलंसं करून घेत अध्यात्माच्या विविध अंगांना स्पर्श केला आहे. **श्लोक, वेद, उपनिषद यांचे वाचन, लेखन,पठण, गायन, मनन, चिंतन अशा सर्व प्रकारे सहभागी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून विषयाचा उद्देश सफल करण्याचा मनःपूर्वक आणि कष्टसाध्य प्रयत्न केलात याचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.**

अनेक अध्यापकांना यातून नक्कीच प्रेरणा मिळेल असे वाटते. आपणासही असे महत्त्वाकांक्षी प्रकल्प आणि नवनिर्मितीची स्वप्न पाहण्याचे आणि साकारण्याचे बळ मिळतच राहील याचीच ही झलक आहे. हे पुस्तक लेखन आणि निर्मितीचे प्रेरणा म्हणजे दैवी शक्तीने आपणास योग्य वेळी दिलेला संकेत आहे असेच वाटते.

**मा.श्री. सुभाष गदादे**

**( प्राचार्य )**

**ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय , निगडी ,पुणे .**

## विशेष अभिप्राय

**नीतिशतकम्** या विषयावरील हे ई - पुस्तक वाचताना खूपच आनंद झाला. ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयातील सर्व संस्कृत अध्यापकांनी एकत्र येऊन संस्कृत अभिरुचि संदर्भात नीतिशतकम् वर केलेल्या कृती या खरोखरच सर्व संस्कृत प्रेमींना प्रेरणादायी आहेत. एखादा विषय निवडल्यानंतर त्याचा कशा पद्धतीने अभ्यास करावा ? याचा उत्तम नमुना या पुस्तकात आपल्याला पाहायला मिळतो. एखादा श्लोक समजून घेताना तो कसा शुद्ध म्हणला पाहिजे, तो कसा शुद्ध लिहिला पाहिजे, त्याच्या अर्थाच्या विविध छटा वेगवेगळ्या पद्धतीने कशा समजून घ्याव्यात, त्यावर गोष्ट कशी रचावी ती गोष्ट कशी सादर करावी, नृत्याच्या माध्यमाचा वापर करून सुद्धा आपल्याला एखादा श्लोक कसा समजून घेता येईल याचा एक चांगला प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळे हे ई पुस्तक अधिकच वाचनीय झाले आहे. या पुस्तकाचे सर्व लेखक अध्यापक कार्यकर्ते व विद्यार्थी यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करते व अशीच अनेक संस्कृत पुस्तके त्यांच्याकडून लिहिली जावो यासाठी शुभेच्छा देते.

**मा. सौ. विद्याताई उदास**

**ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय , निगडी ,पुणे**

# विशेष अभिप्राय

संस्कृत अभिरूची गटातल्या विद्यार्थी व अध्यापकांनी मिळून तयार केलेले नीतिशतकम् e book पाहिले. पुस्तक अतिशय सुंदर झाले आहे. यात नीतिशतकाच्या श्लोकांचा अर्थ आणि स्पष्टीकरण तर आहेच, त्याचबरोबर विविध चित्रे, वेगवेगळ्या प्रकारचे रंजक प्रश्न, कथा यांच्या links असे भरपूर अध्ययन साहित्य परिश्रमाने तयार केलेले आहे. संस्कृत साहित्याचा परिचय करून देणारे लेखनही आहे. हे पुस्तक तयार करताना नीतिशतक विद्यार्थ्यांच्या डोक्यात अगदी आरपार भिनले असणार. त्याशिवाय हे असे पुस्तक तयार झालेच नसते.

**आपल्या संस्कृत साहित्यामधल्या या जुन्या रत्नाचा e book च्या स्वरूपात केलेला असा आधुनिक आविष्कार बघून ' सनातनातील सनातन आणि आधुनिकातील आधुनिक ' याचा संगम होऊ शकतो हे पुन्हा एकदा पटले.**

माझा नीतिशतकाशी परिचय मा. भाऊंमुळे झाला. मी गुरुकुलात काम करत होते तेव्हा ते नववीला संस्कृत शिकवायचे. वर्गाचं पाठयपुस्तक पहिल्या सत्रात शिकवून पूर्ण करायचं आणि दुसऱ्या सत्रात नीतिशतक शिकवायचं असं त्यांनी अनेक वर्षं केलं. भाषा शिक्षणातून भाषेचं व्याकरण, शब्दसंग्रह, संभाषण, लेखन, इ. तर शिकवायचं आहेच पण आपल्या भारतीय साहित्य-संस्कृतीची ओळख करून द्यायची आहे हेही महत्त्वाचं उद्दिष्ट मा. भाऊंच्या डोळ्यासमोर कायम होतं. नीतिशतक मुलांकडून संपूर्ण पाठ करून घेतल्यावर त्यातल्या श्लोकांवर आधारित अनेक अनुभव, किस्से, कथा ते मुलांना सांगत असत.

आपल्या आयुष्यात या श्लोकांच्या नित्य पठणामुळे आपल्याला निरंतर प्रेरणा मिळत राहील अशी खूप मोठी शक्ती या रचनेत आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून अशी प्रेरणा सगळ्यांना सापडण्याची प्रक्रिया घडू शकेल म्हणून खूप आनंद होतो.

मी या संस्कृत अभिरूची गटाच्या अध्यापकांची मार्गदर्शक आहे. पण ज्या गटाची स्वतःची उर्मीच खूप जोरदार आहे ते आपला मार्ग आपणच शोधतात याचं हा गट हे खूप चांगलं उदाहरण आहे, त्यामुळे माझं काम हलकं झाल्याचा मला मनापासून आनंद आहे.

या प्रकल्पाच्या यशाबद्दल विद्यार्थी व अध्यापकांचं खूप खूप कौतुक आणि अभिनंदन!!!

**मा. सौ. माधुराताई लुंकड**
**( इंग्रजी विभाग प्रमुख )**
**ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय , निगडी ,पुणे**


# उपसंहार



**“ काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम् | ”**

असाच काहीसा  हा ६ आठवड्याचा काळ या गटात काम करणाऱ्या संस्कृत अध्यापक आणि विद्यार्थ्यांनी एकत्रित व्यतीत केला.  **ज्ञानप्रबोधिनी विद्यालयात अध्यापक म्हणून काम करताना रोज नवे शिकत जावे आणि करतही जावे असा परिपाठच आहे**. हा  संस्कृत इ -बुक प्रपंच त्याचाच एक भाग होता.  **संस्कृत साहित्याकडे नव्या आणि रंजकपणे कसे पाहता येईल आणि त्याला तंत्रज्ञानाची जोड देऊन हा प्रयत्न सर्वांपर्यंत कसा पोहचवता येईल ? असा विचार करून केलेले हे काम होते.** हे काम करत असताना आम्हा अध्यापकांची सुद्धा विद्यार्थ्यांसोबतच अभिरुची वृद्धिंगत होत होती.हे पुस्तक वाचून जर तुमचीदेखील अभिरुची आम्ही वाढवू शकलो तरच हा केलेला छोटासा प्रयत्न सफल झाला असे म्हणता येईल. प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे  ' **छोट्या कामाचा उपसंहार हा मोठया कामाची नांदी असतो किंबहुना तो ठरायला हवा ' .** हे उद्दिष्ट ठेवूनच पुढील वर्षभरात केलेले संस्कृत उपक्रम आपल्या पर्यंत पोहचविण्याचा आमचा मानस आहे. या वाटचालीसाठी तुमच्या सदिच्छा आणि आशीर्वाद मिळोत हीच सर्व भाषांची जननी असलेल्या संस्कृतभाषादेवीच्या चरणी प्रार्थना करतो. धन्यवाद!!!

# परिशिष्ट



# वेदाः

ज्याच्या द्वारे देवतांची स्तुती केली जाते त्याला ऋक्- ऋचा किंवा मंत्र म्हणतात. " **ऋच्यते स्तूयन्ते देवा अनया इति ऋक् |** " **मननात् मन्त्राः |** - अशा ऋचा अथवा मंत्रांचा समूह म्हणजे **संहिता** . या संहिता ऋक् , यजु, साम आणि अथर्व या नावाने ओळखल्या जातात. याच संहितांचे दुसरे नाव **वेद** आहे. वेदाची व्याख्या करताना आचार्य सायण म्हणतात ," **अपौरुषेयं वाक्यं वेदः |** " किंवा " **इष्टप्राप्त्यनिष्टपरिहारयोः अलौकिकमुपायं वेदयते स वेदः |**" महर्षी दयानंद म्हणतात ," **विदन्ति -जानन्ति , विद्यन्ते - भवन्ति ,विदन्ते सर्वाः सत्य-विद्या यैः यत्र वा स वेदः |** " अर्थात् ज्याच्या अंतर्गत सर्व सत्य विद्यांचा ज्ञान प्राप्त होते त्याला ' **वेद** 'असे म्हणतात.

ऋग्वेद यजुर्वेद सामवेद आणि अथर्ववेद हे वेदांचे चार विभाग आहेत. **द्वापर युगाच्या समाप्ती पूर्वी** वेद या चार विभागांमध्ये विभागले गेले नव्हते त्यावेळी ऋक् ,यजु आणि साम या तीन शब्द शैली मध्ये संग्रहित अशी एक शब्द राशी होती तिला **वेद** असे म्हटले जायचे.त्यानंतर अथर्ववेदाला चौथा वेद मानले गेले.

संपूर्ण विश्वात **शब्द प्रयोग** करण्याच्या एकूण तीन शैली मानल्या जातात **पद्य , गद्य आणि गेय.** पद्यात अक्षरसंख्या आणि पद यांचे निश्चित नियम असतात. अशा सुनिश्चित अक्षरसंख्या, पद असणाऱ्या मंत्रांना **ऋक्** अशी संज्ञा दिलेली आहे.ज्या मंत्रामध्ये छंदाच्या नियमानुसार अक्षरसंख्या व पद ऋषींनी सांगितल्याप्रमाणे नाही त्या गद्यात्मक मंत्रांना **यजु** असे म्हटले जाते आणि जे मंत्र गेय स्वरुपात आहेत त्यांना **साम** म्हटले गेले आहे. या तीन प्रकारच्या शब्द शैली वरूनच वेदांसाठी **त्रयी** असा शब्दप्रयोग केला जातो.

भगवान **वेद व्यासांनी** यज्ञ अनुष्ठान करताना मदत व्हावी म्हणून या एका वेदराशीची ऋग्वेद, यजुर्वेद ,सामवेद आणि अथर्ववेद अशा चार विभागांमध्ये विभागणी केली आणि **पैल ,वैशंपायन ,जैमिनी आणि सुमन्तु** अशा आपल्या चार शिष्यांना ते शिकवले.नंतर या चार जणांनी आपल्या आपल्या शिष्यांना या वेदांची संथा दिली.

## ऋग्वेद

ऋग्वेद म्हणजे ' ऋचांचा संग्रह ' . ऋचा म्हणजे ज्यांच्या द्वारे देवतांची स्तुती केली जाते ' ऋग्वेदात एकूण **दहा मंडले** आहेत आणि १०१७ **सूक्ते** आहेत. ऋग्वेदाची अध्ययन परंपरा **पैल** ऋषी पासून सुरू होते. महर्षी पतंजली च्या महाभाष्या नुसार ऋग्वेदाच्या एकूण २१ शाखा आहेत. ऋग्वेदात **एकूण** ३३ **देवतांचे वर्णन** केलेले आहे .यात **इंद्र आणि अग्नी** या प्रमुख देवता आहेत तसेच काही ठिकाणी नदी, पर्वत ,सूर्य ,मरुत, उषा वरूण इत्यादींचे सुद्धा छान वर्णन केलेले आहे .ऋग्वेदात **२० सूक्ते** अशी आहेत की त्यांना **संवाद सूक्त** म्हटले जाते. ज्यात पुरुवा -उर्वशी ,सरमा - पणि तसेच विश्वामित्र - नदी ही संवाद सूक्ते फार प्रसिद्ध आहेत. या संवाद सूक्तां वरूनच संस्कृत मध्ये अनेक नाटकांचा आणि काव्यांचा जन्म झाला . अशाप्रकारे ऋग्वेद विश्व साहित्यातला सर्वात प्राचीन ग्रंथ आहे.

## यजुर्वेद

यजुर्वेदात यजुंचा संग्रह आहे . **यजुस्** चा अर्थ आहे गद्यात्मक मंत्र ज्यात अक्षरांची संख्या निश्चित नसते. "अनियताक्षरावसानो यजु: |" किंवा " गद्यात्मको यजु: |" यजुर्वेदाची मुख्य देवता **वायू** ही आहे आणि त्याचे **प्रमुख आचार्य** वेद व्यासांचे शिष्य **वैशंपायन ऋषी** आहेत. यजुर्वेदाच्या **शुक्ल यजुर्वेद आणि कृष्ण यजुर्वेद** अशा **दोन** प्रमुख शाखा आहेत. या दोन शाखांच्या निर्मितीविषयी एक **आख्यायिका** उपलब्ध आहे. महर्षी वेदव्यास यांनी संपूर्ण वेद संहितेचे **चार वेदांमध्ये** विभाजन केले आणि आपल्या ४ शिष्यांना ते वेद शिकवले त्यापैकी **वैशंपायन ऋषींना यजु**र्वेद शिकवला. वैशंपायन ऋषींनी **याज्ञवल्क्य** इत्यादी शिष्यांना यजुर्वेदाच्या उपदेश केला .काही काळानंतर वैशंपायन ऋषी याज्ञवल्क्य ऋषींवर खूप जास्त क्रोधीत झाले आणि त्यांनी त्यांना शिकवलेले ज्ञानाचा आणि वेदविद्येचा त्याग करण्यास सांगितला. गुरूच्या आज्ञेनुसार याज्ञवल्क्य यांनी आपल्या योग्य बलाने संपूर्ण वेदविद्येला मूर्त रूपात आणले आणि त्याचे वमन केले. वमन केलेले मंत्र वैशंपायन ऋषींच्या इतर शिष्यांनी **तित्तिर** रूप धारण करून भक्षण केले. त्याच मंत्रांना **कृष्ण यजुर्वेद** नाव मिळाले. दुसरीकडे अत्यंत दुखी ते झालेल्या याज्ञवल्क्य ऋषीनी कठोर तपस्या करून सूर्याला प्रसन्न केले .सूर्याने **वाजी** म्हणजे **अश्वाचे** रूप धारण करून माध्यान्हाच्या वेळी या मंत्रांचा उपदेश केला. अशाप्रकारे सूर्याकडून प्राप्त झालेल्या मंत्रांना **शुक्ल मंत्र** असे म्हटले गेले .दिवसाच्या माध्यान्हाच्या वेळी व हे मंत्र प्राप्त झाल्यामुळे त्यांना **माध्यंदिन** आणि वाजी रूपात सूर्याने उपदेश केल्यामुळे **वाजसनेयी** म्हटले गेले .शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसनेयी आणि माध्यंदिन संहिता उपलब्ध आहेत.

अशाप्रकारे यजुर्वेदाच्या सर्व प्रमुख ग्रंथात यज्ञ कसा करावा ?याची माहिती आपल्याला मिळते विविध ज्ञान चा उल्लेख आपल्याला या वेदात पाहायला मिळतो.

## सामवेद

साम शब्दाचा अर्थ आहे ' देवांना प्रसन्न करणारे गीत' .**सा** आणि **अम** या दोन शब्दांचा मिळून साम शब्दाची उत्पत्ती झालेली आहे .ज्यात **सा** चा अर्थ **ऋचा** आणि **अम** चा अर्थ आहे ऋषभ ,गांधार इत्यादी **सप्तस्वर** म्हणून **ऋग्वेदाच्या ज्या ऋचा जेव्हा स्वरांसोबत म्हटले जातात तेव्हा साम तयार होतात.**

सामाचे महत्त्व **शतपथ ब्राह्मणात** सांगितलेले आहे की " **नासामा यज्ञो भवति।"** अर्थात साम शिवाय यज्ञ होऊ शकत नाही . गीतेत सुद्धा श्रीकृष्ण स्वयम् सांगतात " **वेदानां सामवेदोऽस्मि** | "

सामवेदाचे परंपरा वेदर व्यासांचे शिष्य असलेल्या **जैमिनी ऋषीं** पासून सुरू होते. जैमिनी ऋषींनी आपला मुलगा **सुमन्तु**, सुमन्तुने आपला मुलगा **सून्वान** आणि सून्वान ऋषींनी आपला मुलगा **सुकर्मा** याला सामवेद शिकवला .अशाप्रकारे सामवेदाची अध्ययन परंपरा निरंतर चालत आलेली आहे.

सामवेदाचे मुख्य देवता सूर्य असून सामवेदाचे ऋत्विक उद्गाता हे आहेत जे यज्ञात सामना यांचे पठण करतात जरी या वेदाच्या सहस्त्र शाखा सांगितलेल्या असल्या तरीसुद्धा सध्याच्या काळात सामवेदाचे दोन प्रमुख भाग सांगितलेले आहेत. **१. पूर्वार्चिक २. उत्तरार्चिक.**

**आर्चिक म्हणजे संग्रह.ऋचांचा संग्रह .पूर्वार्चिकामध्ये ६ प्रपाठक आहेत तर उत्तरार्चिकात ९ प्रपाठक आहेत.पूर्वार्चिकामध्ये** ऋचा काय असे चार प्रकार सांगितले आहेत १.ग्राम गान २. अरण्य गान ३.उह गान ४. ऊहय गान . **उत्तरार्चिकात** काही मंत्र पूर्वार्चिकातूनच घेतले आहेत. अशाप्रकारे **ऋचा गान** यासंबंधीचा वेद सामवेद म्हणून ओळखला जातो.

## अथर्ववेद

वेदांच्या गणनेत नंतर जोडला गेला जाणारा वेद म्हणून अथर्ववेदाकडे बघितले जाते. **अंगिरा वंशीय अथर्वा ऋषि** याचे प्रमुख आचार्य मानले जातात म्हणून याला **अथर्ववेद** असे नाव आहे.याचे ऋत्विक **ब्रह्मा** आहेत. या वेदाची प्रमुख देवता **सोम** आहे आणि **प्रमुख आचार्य सुमन्तु** आहेत. अथर्ववेदात यज्ञाविषयी चा भाग कमी आणि अभिचारात्मक भाग जास्त आहे त्यामुळे अथर्ववेदाला या तीन वेदांपेक्षा कमी महत्त्व आहे. सम्पूर्ण अथर्ववेदात एकूण २० कांड, ३४ प्रपाठक, १११ अनुवाक , ७३९ सूक्त तसेच ५८४९ मंत्र आहेत. यात साधारण १२०० मंत्र ऋग्वेदातून घेतले आहेत.

**ऋग्वेदादि** तिन्ही वेदांचा विषय **पारलौकिक** आहे तर **अथर्ववेदाचा** विषय **ऐहिक** आहे. या जीवनाला दुःख रहित बनवून सुखाकडे जाण्यासाठी ज्या ज्या साधनांची आवश्यकता आहे, त्यासाठी लागणाऱ्या विविध अनुष्ठाने , विधी या वेदात दिलेले आहेत. **पहिल्या तेरा** कांडामध्ये जारण-मारण इत्यादी विषयक मंत्र, **चौदाव्या कांडात** विवाहाविषयी तर ,**अठराव्या** कांडात श्राद्धा विषयी तसेच **बाविसाव्या कांडात** सोम यागाशी संबंधित मंत्र दिलेले आहेत , **एकोणिसाव्या कांडा** मध्ये राष्ट्र वृद्धीसाठी अध्यात्म पर सूक्त दिलेले आहेत. अशाप्रकारे अथर्ववेदाच्या विषय विवेचनावरून आपल्याला समजते की यात धर्म ,अर्थ, काम आणि मोक्ष हे पुरुषार्थ मिळवण्यासाठी सर्व अंगांचे वर्णन केलेले आहे .**शास्त्रीय दृष्टिकोनातून** धर्म ,दर्शन तसेच अध्यात्म यांचे विवेचन आहे, तर **समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून** राजनीती, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र ज्ञान-विज्ञान याचे भांडार आपल्याला यात मिळते ,**साहित्याच्या दृष्टीने** रस, छंद ,अलंकार तसेच भाव ,भाषासौंदर्य इत्यादी रूपाने परिपूर्ण असलेला हा वेद आहे तर, **व्यावहारिक दृष्टिकोनातून** भावात्मक प्रेरणा, मनन-चिंतन ,सदाचार नीति ,उपदेश कथन करणारा हा वेद आहे अशाप्रकारे अथर्ववेद **वैदिक साहित्याचा शिरोमणी** म्हटले जाते. धन्यवाद !!

**वेद माहिती संकलन - सौ. श्वेतल महात्मा**

# षड्वेदांगे

वेदांना पूर्ण प्रमाण आणि पवित्र मानणाऱ्या वैदिकांची अशी श्रद्धा होती, की वेदांतील विधिनिषेधांच्या पालनानेच आपल्या भावी पिढ्यांचे ऐहिक व पारलौकिक कल्याण होईल. त्यामुळे वेदांचे पठन पिढ्यान्‌पिढ्या चालू ठेवून वैदिक साहित्य जिवंत ठेवले गेले. त्याच कारणाने वेदांचे बौद्धिक चिंतन सुरू झाले व त्या चिंतनातून वैदिकांना बौद्धिक ज्ञानाचा पाया घालता आला. त्यातून वेदांगे निर्माण झाली. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरूक्त, छंद आणि ज्योतिष अशी एकूण सहा वेदांगे आहेत.

छन्दः पादौ तु वेदस्य हस्तौ कल्पो Sथ पठ्यते
ज्योतिषामयनं चक्षुर्निरूक्त श्रोत्रमुच्यते।
शिक्षाघ्राणं तु वेदस्य मुखं व्याकरणं स्मृतम्
तस्मात् साङ्गमधीत्यैव ब्रह्मलोके महीयते ॥

छंदशास्त्र, कल्पसूत्रे,ज्योतिष, निरुक्त, शिक्षा आणि व्याकरण ही सहा शास्त्रे वेदवाङ्मयाचे अनुक्रमे पाय, हात, डोळे, कान, नाक आणि मुख आहे अशी कल्पना केली आहे. वेदांगांची निर्मिती ही वेदाध्ययनाला पूरक अभ्यास म्हणून झाली. मात्र त्यांचा वैदिकोत्तर काळातील शास्त्रे, कला,संस्कृती,साहित्य यांवर फार मोठा प्रभाव पडला.

१) शिक्षा: वेदमंत्रांचे उच्चारण शुद्ध व अचूक होण्याच्या दृष्टीने ध्वनिशास्त्राचा अभ्यास करून रचण्यात आलेल्या शास्त्रांना 'शिक्षा' असे म्हणतात. काही प्राचीन शिक्षा-ग्रंथ आज उपलब्ध नसले, तरी ध्वनिशास्त्राविषयी मान्यताप्राप्त अशा सर्वसामान्य निष्कर्षांचा आपापल्या शाखेनुसार विचार करणारे ग्रंथ मिळतात. त्यांना प्रातिशाख्ये म्हणतात.

२) कल्प : ह्या वेदांगास 'कल्पसूत्रे' असेही म्हणतात. कल्पसूत्रांमध्ये श्रौतसूत्रे, शुल्बसूत्रे, गृह्यसूत्रे आणि धर्मसूत्रे ह्यांचा समावेश होतो. संहिता व ब्राह्मणग्रंथ ह्यांतील यज्ञसंस्थेचे सांगोपांग स्वरूप व्यवस्थित, एकत्र आणि विषयवारीने उपलब्ध करण्यासाठी श्रौतसूत्रे निर्माण झाली. काही श्रौतसूत्रांना–उदा., बौधायन, मानव, आपस्तंब व कात्यायन – 'शुल्बसूत्र' नावाचा अध्याय जोडलेला असतो. यज्ञकुंड, यज्ञवेदी, यज्ञमंडप तयार करताना घ्यावयाच्या मोजमापांचे गणित शुल्बसूत्रांत सांगितलेले असते. भारतीय भूमितीचे प्राथमिक स्वरूप शुल्बसूत्रांत दिसते. गृह्यसूत्रांत नामकरण, उपनयन, विवाह इ. सोळा संस्कार तसेच श्राद्धे ह्यांचे विधी सांगितले आहेत. आश्वलायन, शाखायन, बौधायन, आपस्तंब, पारस्कर, गोभिल, कौशिक इ. १७ गृह्यसूत्रे आज उपलब्ध आहेत. धर्मसूत्रांत त्रैवर्णिक समाजाचे आश्रमधर्म व लौकिक आचारधर्म म्हणजे कायदे व राजधर्म सांगितले आहेत. वर्णधर्म व आश्रमधर्म हे धर्मसूत्रांचे मुख्य विषय होत. मनू, याज्ञवल्क्य इत्यादींच्या स्मृतींच्या पूर्वी झालेले आणि मुख्यतः गद्यात्मक सूत्रशैलीत लिहिलेले हे ग्रंथ आहेत.

३) व्याकरण : वेदमंत्रांतील शब्द अपभ्रष्ट होऊ नयेत, तसेच संधी होऊन शब्दात बदल होत असल्यामुळे मूळ शब्द कसा आहे तो कळावा तसेच अर्थही कळावा ह्यांसाठी वैदिक मंत्रांचा पदपाठ तयार करण्यात आला. तो करताना व्याकरण अगोदरच तयार होते. पदपाठ तयार झाल्यानंतर संस्कृत भाषेत बदल झालेले होते. तेव्हा सबंध शिष्ट संस्कृतचे व्याकरण तयार झाले. अनेक व्याकरणे झाली. त्यांत पाणिनीचे व्याकरण श्रेष्ठ ठरले.

४) निरुक्त : वेदांची भाषा कालांतराने समजणे कठीण जाऊ लागले. त्यामुळे शब्दांची व्युत्पत्ती व अर्थ सांगण्याचे शास्त्र निर्माण झाले. तेच निरुक्त होय. वेदांतील शब्दांचे व धातूंचे संग्रह म्हणजे 'निघंटू' हा शब्दकोश. वैदिक समानार्थक व अनेकार्थक पदांचा वा धातूंचा जो सर्वप्राचीन उपलब्ध कोश आहे, त्याला निघंटू असे नाव आहे. ह्या कोशावर यास्काने लिहिलेले भाष्यही निरुक्त ह्या नावाने प्रसिद्ध आहे.

५) छंद : छंद ह्या वेदांगाला 'छंदोविचिती' अशीही संज्ञा आहे. वेदांतील बरेच मंत्र छंदोबद्ध असून छंद हे वेदमंत्रांप्रमाणे वेदमंत्रांनी करावयाच्या यज्ञकर्माशीही निगडित आहेत. ब्राह्मणग्रंथांमध्ये छंदाच्या गूढ व अद्भुत सामर्थ्याची वर्णने येतात. पिंगल यांचा छंदः सूत्र हा ग्रंथ ह्या वेदांगाचा प्रतिनिधी मानला जातो.

६) ज्योतिष : वेदकाली ज्योतिष हे सहावे वेदांग तयार झाले होते. सत्तावीस नक्षत्रे, चंद्राच्या अवस्था, सूर्याचे संक्रमण, ऋतूंची परिवर्तने ह्या सर्वांचे पद्धतशीर परिगणन यज्ञाच्या निमित्ताने वैदिक ऋषीला काळजीपूर्वक करावे लागे. श्रौत व गृह्य कर्मांसाठी लागणारे पंचांग वैदिक काळी अस्तित्वात आले. सत्तावीस नक्षत्रांची आकाशातील मांडणी ही प्रथम वेदकाली वैदिकांनी शोधली. शुक्लयजुर्वेदात 'नक्षत्रदर्श' म्हणजे ज्योतिषी ह्याचा उल्लेख आलेला आहे. वेदांगज्योतिषाचे बरेच ग्रंथ लुप्त झाले असून लगध नामक आचार्यांचा 'ज्यौतिषम्' (इ. स. पू. १४००) हा एकच लहानसा निबंध शिल्लक राहिला आहे. ह्या निबंधाचे ऋग्वेद शाखेत ३६ व यजुर्वेद शाखेत ४४ श्लोक मिळतात. यांतील अनेक श्लोक क्लिष्ट असून त्यांचा अर्थ नीट लागत नाही. त्यात ३६६ दिवसांचे वर्ष व पाच वर्षांचे एक युग होते, असे म्हटले आहे. उत्तरायण व दक्षिणायन केव्हा होते, ह्याचे गणित त्यात सांगितले आहे. लगध यांच्या कालखंडात गर्ग ह्या आचार्यांनी केलेली गर्गसंहिता आज लुप्त झालेली असली, तरी तिच्यातील संदर्भ नंतरच्या ग्रंथांमध्ये घेतलेले आढळतात. ह्या आचार्य गर्गांचा महाभारतात ज्योतिषशास्त्रज्ञ म्हणून निर्देश केलेला आहे. पितामहसिद्धांत हा ग्रंथही ह्याच कालखंडात झाला. त्याचा सारांश वराहमिहिराने पंचसिद्धांतिकेत दिला आहे. वेदकालीन ज्योतिषनिबंध नष्ट का झाले, हे सांगणे कठीण आहे. तथापि त्याचे एक कारण दिसते, ते असे : इसवी सनानंतर पुराणांचा प्रसार झाला. पुराणांमध्ये अतिशयोक्ती करण्याची व साध्या माहितीला अद्भुत रूपे देण्याची प्रवृत्ती वाढली. परिणामतः वेदांगज्योतिषातील साधी व वास्तविक कालगणनापद्धती पुराणिकांनी सोडून दिली व अवास्तव कालगणनेत इतिहास सांगण्यासाठी युग व कल्प ह्यांच्या वर्षसंख्या फारच फुगवल्या. त्यामुळे वेदांगज्योतिष नष्ट झाले असावे, असा तर्क आहे.

**-वेदांगमाहितीसंकलन**

**-सौ.सरिता पत्तेवार**

# षड्दर्शने

भारतीय तत्त्वज्ञान परंपरेमध्ये षड्दर्शनांची संकल्पना येते. यामध्ये **न्याय पूर्वमीमांसा व , योग , सांख्य, वैशेषिक , उत्तरमीमांसा** ह्या आस्तिक दर्शनांचा समावेश होतो.वेदप्रामाण्य मानणारी दर्शने आस्तिक दर्शने मानली जातात. **'दृश्यते अनेन इति दर्शनम्|'** अशी व्याख्या दर्शन या पदाची केली जाते, अर्थात ज्ञानचक्षुंद्वारे आत्मादी अलौकिक वस्तूंचे ज्ञान होणे म्हणजे दर्शन.

भारतीय तत्वज्ञानाचा गाभा असलेल्या वेद व उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचे विविध प्रकारे केलेले चिंतन व त्या चिंतनाचा परिपाक म्हणून निर्माण झालेले मतप्रवाह म्हणजेच ही दर्शने होत. आत्मज्ञान -आत्मस्वरूपाचे यथार्थ ज्ञान करून घेणे , सृष्टीच्या उत्पत्तीच्या तत्त्वाचे ज्ञान करून घेणे हे या सर्व दर्शनांचे मुख्य प्रयोजन आहे.'आत्मज्ञानसाधन ' असलेल्या या दर्शनांचा अल्पपरिचय असा करून देत येईल-

## १) न्यायशास्त्र-

नीयते बुद्धिः तैक्ष्ण्यं अनेन इति न्यायदर्शनम् । अशी न्यायदर्शनाची व्याख्या केली जाते . आरंभवाद संमत असलेल्या या शास्त्राने १६ पदार्थ मानले असून प्रत्यक्ष , अनुमान , उपमान व शब्द या प्रमाणांद्वारे पदार्थांचे सम्यक् ज्ञान झाल्यास मोक्षप्राप्ती होते असे असे म्हटले आहे .कार्यकारणवादाचा पुरस्कार करण्याऱ्या या प्रमाणदर्शनाचे प्रवर्तक 'गौतमऋषी' असून इ.सनाच्या दुसऱ्या शतकात त्यांनी 'न्यायसूत्र' या ग्रंथाची रचना केली . अक्षपाददर्शन , न्यायविद्या , तर्कशास्त्र , आन्वीक्षिकी या नावांनी प्रसिद्ध असलेले न्यायदर्शन 'सर्वशास्त्रांना उपकारक' म्हणून विख्यात आहे .

## २)वैशेषिकदर्शन -

सर्वप्रथम 'विशेष' या पदार्थाचे विवेचन करणारे दर्शन 'वैशेषिक दर्शन' म्हणून ओळखले जाते . पंचमहाभूतांपासून जगताची उत्पत्ती मानणाऱ्या दर्शनाचे प्रवर्तक कणादमहर्षी प्रवर्तक असून औलूक्यदर्शन या नावानेही वैशेषिकदर्शन ज्ञात आहे . 'वैशेषिकसूत्राणि' हा या दर्शनाचा मुख्य ग्रंथ असून परमाणु अतिसूक्ष्म असून त्यापेक्षा सूक्ष्म काहीही नाही, प्रत्येक पदार्थ हा परमाणुपासून उत्पन्न होतो असे प्रतिपादन यात केले आहे .या दर्शनाने द्रव्य , गुण , कर्म , सामान्य , विशेष ,समवाय आणि अभाव असे 'सप्तपदार्थ' मानले असून प्रत्यक्ष आणि अनुमान या दोन प्रमाणांद्वारे सप्तपदार्थांचे सम्यक् ज्ञान प्राप्त झाले असता मोक्षप्राप्ती होते , अशी या दर्शनशास्त्राची धारणा आहे .

### ३)सांख्यदर्शन -

कपिलमुनी हे सांख्यदर्शनाचे प्रणेते असून सांख्यसूत्रे हा या दर्शनाचा प्रमाणग्रंथ आहे . विश्वातील मूलत्त्वांचे २५ तत्त्वांमध्ये सम्यक् प्रकारे वर्गीकरण करून  त्यांचे क्रमपूर्वक केलेले कथन किंवा विवेचन म्हणजेच सांख्यदर्शन होय.सत्त्व , रज व तम या त्रिगुणांची साम्यावस्था असलेली , अचेतन व एक प्रकृती व चेतन व असंख्य असे पुरुष अशी दोन तत्त्वे सांख्यदर्शन मानते .सांख्यांनी प्रत्यक्ष , अनुमान व आप्तवाक्य ही तीन ज्ञानप्राप्तीची प्रमाणे मानली असून जड प्रकृतीहून मी सर्वथा भिन्न आहे याचे ज्ञान झाल्यावर पुरुष जन्ममृत्युचक्रातून मुक्त होतो अशी या शास्त्राची धारणा आहे .

### ४) योगदर्शन -

पतंजलि हे योगदर्शनाचे प्रणेते असून 'योगसूत्रे' हा या मूलभूत ग्रंथ आहे .चित्तवृत्तींचा निरोध म्हणजे योग .याच्या आठ पायऱ्या / मार्ग असल्याने याला अष्टांग योग असेही म्हणतात. यम , नियम , आसन ,प्राणायम , प्रत्याहार , धारणा , ध्यान आणि समाधी ही ती आठ अंगे आहेत . सृष्टीउत्पत्तिविषयक सांख्यांचे सर्व सिद्धांत योगदर्शनाने स्वीकारले असून त्यामध्ये ईश्वर या एका संकल्पनेचा समावेश केल्याने त्यांना सेश्वरसांख्य असेही म्हणतात.

### ५) पूर्वमीमांसा -

पूर्वमीमांसासूत्रे हा पायाभूत ग्रंथ असलेल्या या दर्शनाचे प्रवर्तक जैमिनी हे आहेत . सातव्या शतकामध्ये भाट्ट व प्राभाकर असे दोन संप्रदाय या दर्शनामध्ये निर्माण झाले .मीमांसा या पदाचा सामान्य अर्थ चिकित्सापूर्वक परामर्ष किंवा संबंधनिश्चिती असा असून याचा  विशेष  रूढ अर्थ हा वेदवचनांच्या परिशीलनाने त्यांचा समन्वय करणे असा आहे . ह्याच अर्थाने वेदातील कर्मकांडपर भागाचा परस्पर समन्वय साधणारे दर्शन म्हणजे पूर्वमीमांसा होय .प्रत्यक्ष , अनुमान , उपमान व शब्द ही चार मुख्य प्रमाणे स्वीकारली असून   अनुपलब्धि , अर्थापत्ती यांचाही समावेश प्रमाणांमध्ये केला आहे .मीमांसकांच्या मते वेदवाक्यांचे  विधि , मंत्र , निषेध व अर्थवाद असे चार प्रकार आहेत .मीमांसा हे वाक्यांचा अर्थ लावण्याचे शास्त्र आहे .भाषाशास्त्र व तर्कशास्त्राच्या दृष्टीने मीमांसाशास्त्र महत्वाचे आहे .

### ६)उत्तरमीमांसा -

ज्ञानकांडातील वेदवचनांचा समन्वय करणारे शास्त्र म्हणजे उत्तरमीमांसा.उत्तरमीमांसेचे वेदांत हे नाव अधिक प्रचलित आहे .वेदांच्या अंती असलेल्या  उपनिषदविचारांची चर्चा यात आल्याने यास वेदांतदर्शन असे म्हणतात .किंवा अखिल वेदांचा निष्कर्ष म्हणून सांगितलेले सिद्धांत  म्हणजे वेदांत असेही म्हटले  जाते.उपनिषदे , ब्रह्मसूत्रे आणि भगवद्गीता यांना वेदांताची प्रस्थानत्रयी म्हणतात .उपनिषदे , ब्रह्मसूत्रे आणि भगवद्गीता यांना वेदांताची प्रस्थानत्रयी म्हणतात .विविध आचार्यांनी यावर भाष्ये लिहिली व यातूनच वेदांताचे केवलाद्वैत ,विशिष्टाद्वैत, द्वैतवाद , शुद्धाद्वैत व द्वैताद्वैत असे संप्रदाय निर्माण झाले .या पाचही संप्रदायांमध्ये काही सैद्धांतिक  मतभेद असले तरी ब्रह्मतत्त्वावर विश्व प्रतिष्ठित आहे , मोक्षप्राप्ती हा परमपुरुषार्थ आत्मस्वरूप जाणल्याने प्राप्त होतो इ .विचारांमध्ये साम्य जाणवते.

सामान्यतः सर्व दर्शनकारांनी विश्वाचे स्वरूप , जीवनाचे अंतिम ध्येय व त्याच्या प्राप्तीचे मार्ग , व ज्ञानप्राप्तीची साधने यांचा विचार केला मूळ ग्रंथांत मांडला असून मूळ सूत्रग्रंथांवरील भाष्ये , वार्तिके,टीका , वृत्ति अशा अनेक अंगांनी दर्शन वाङ्मयाचा विस्तार होत गेला व भारतीय दर्शनपरंपरा अधिकाधिक समृद्ध झाली .




-दर्शनमाहितीसंकलन

- कु.प्राजक्ता रानडे.

## उपनिषद्-धर्मः |

उपनिषद या शब्दात उप, नि व सद् अशी तीन पदे आहेत. उप म्हणजे जवळ. सद् म्हणजे बसणे, नि म्हणजे नम्र, मनापासून. आत्मविद्येच्या अभ्यासासाठी गुरुसान्निध्यात वावरणे म्हणजे 'उपनिषद'. उपनिषदांना 'वेदान्त' म्हणतात. उपनिषदे बरीच आहेत. प्रस्थानत्रयीत भगवद्गीता, ब्रह्मसूत्रे, दशोपनिषदे येतात. उपनिषदात आत्मानुभूती, काव्य, रूपके आहेत. साधनांचा आलेख आहे. तर्काचे घाट आहेत. तत्त्वचिंतनांची रमणीय, भव्य उद्याने आहेत. वैदिक संस्कृत ही उपनिषदांची भाषा आहे. छांदोग्य, बृहदारण्यक, ऐतरेय, तैत्तिरीय, प्रश्न, केन, कौषीतकी ही गद्य उपनिषदे आहेत. ईश, कठ, मुंडक, मांडुक्य, श्वेताश्वतर ही पद्य उपनिषदे आहेत. अध्यात्मातील गूढगहन सिद्धान्त सुंदर सांगावे ते उपनिषदांनीच! श्रीमद् आद्य शंकराचार्यांच्या मते, अज्ञानाचा नाश करणारी ब्रह्मविद्या म्हणजे उपनिषद. मानवी जीवन आनंदमय कसे होईल ते उपनिषद सांगते. संपूर्ण विश्वातील अध्यात्मविद्येचा मूळ गाभा उपनिषदांमध्ये आढळतो. यजुर्वेदातील वाजसनेयी संहितेतला चाळिसावा अध्याय म्हणजे ईशावास्योपनिषद होय. याचा भावार्थ- जगात जे काही आढळते ते सर्व ईश्वरव्याप्त आहे. जगातील सर्व वस्तूंचा त्यागाने भोग घ्यावा. दुसऱ्याच्या धनाची अपेक्षा करू नये. या जगात सत्कर्मात शंभर वर्षे जगण्याची इच्छा करावी. आत्मज्ञान सामाजिकतेसाठी प्रत्यक्षात आणावे. अभ्यासाने मन सूक्ष्म करून भूतमात्रांना आपले मानवी जीवनातील दु:खाचे मुळ आसक्तीत आहे. विद्या आणि अविद्या यांना जो जाणतो तो मृत्यूला पार करतो. विद्येने अमर होतो. अव्यक्त आणि व्यक्त ब्रह्माची उपासना करावी. सूर्याचे ध्यान करावे. अमृतत्त्व हे जन्माचे सार्थक आहे. अग्नी हा ईश्वराचे प्रतीक आहे. तो ऊर्ध्वगामी आहे. तो अनेकातून एकाकडे जातो. म्हणून त्याला ऋषी वंदितात. याचा भाव लक्षात घ्या! तो म्हणजे- विश्व जाणा. दुष्ट वृत्तींना वेळ देऊनका. पापांना तिथल्या तिथे ठेचा. मग बघा! प्रार्थनेतला ईश्वर तुमच्या हृदयात आनंदाने बागडेल. हेच ईश्वरदर्शन. ज्ञानोबाराय म्हणतात, ''हरि आला रे, हरि आला रे। संतसंगे ब्रह्मानंदु झाला रेऽऽ।'' जगणे केवढे सुंदर गाणे आहे हे ज्या ऋषीने सांगितले त्याला नमस्कार!

ईश-केन-कठ-प्रश्न-

मुण्ड-माण्डूक्य-तित्तिरी।

ऐतरेयं च छान्दोग्यं

बृहदारण्यकं तथा।।

प्रमुख दहा उपनिषदे -

१.ईशावास्योपनिषद.

यजुर्वेदातील वाजसनेयी संहितेत मध्ये हे उपनिषद आलेले आहे. वाजसनेयी संहितेचे 40 अध्याय आहेत त्यातील 40 वा अध्याय म्हणजेच ईशावास्योपनिषद आहे.

मंत्र.

ईशावास्यमिदं  सर्वं यत्किञ्च   जगत्यां जगत् । तेन त्यक्तेन  भुञ्जीथा मा गृधः कस्यचिद्धनम् ।।

जगामध्ये जे काही आढळते ते सर्व ईश्वराने व्यापलेले आहे.जगातील सर्व वस्तूंचा त्यागाने भोग घ्यावा दुसऱ्याच्या धनाची अपेक्षा करू नये. विद्या म्हणजे काय अविद्या म्हणजे काय? याचे सविस्तर व्याख्यान ईशावास्योपनिषद यामध्ये केलेले आहे.

२. केनोपनिषद.

केन शब्दाने आरंभ पावती म्हणून या उपनिषद आला केनोपनिषद असे म्हणतात सामवेदाच्या तलवकार  शाखेचे हे उपनिषद् असून याचे चार खंड आहेत पहिले दोन खंड पद्यात्मक असून त्यामध्ये शुद्ध आत्म स्वरूपाचे वर्णन आढळते. दोन खंड गद्यात्मक असून त्यामध्ये ईश्वराचे स्वरूप त्याची उपासना आणि शम  दमादी साधने सांगितली आहेत. एकंदर उपनिषद लहान असले तरी महत्त्वाचे आहे.

मंत्र

तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि सन्तु ।

आत्म्यामध्ये रत  झालेला जो मी त्याच्या ठिकाणी उपनिषद वउपनिषदात सांगितलेली ब्रह्मविद्या प्रकट होवो. आत्मज्ञान हे मानवी जीवनाचे ध्येय होय. चौथ्या खंडामध्ये उमा हैमावती यांच्या आख्यानातून परमेश्वराची सर्व शक्ती संपन्नता हे पटवून दिलेले आहे.

३. कठोपनिषद

दहा उपनिषदांमध्ये कठोपनिषदाला  अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.हे  विस्ताराने फार मोठे  नसले  तरी या उपनिषदांमध्ये मनुष्याच्या अध्यात्मिक जीवनाबद्दल काही अत्यंत मार्मिक सूचना आढळतात. यजुर्वेदातील तैत्तिरीय  शाखेचे हे उपनिषद् कठोपनिषद या नावाने प्रसिद्ध आहे. यातील काही श्लोक भगवद्गीतेमध्ये घेतलेले आहेत. प्रत्येक भारतीय तरुणांनी कठोपनिषद तोंडपाठ करून आचरणात आणावे असे स्वामी विवेकानंद म्हणतात. या उपनिषदाचे दोन अध्याय असून प्रत्येक अध्यायाच्या तीन वल्ली म्हणजे लहान लहान विभाग आहेत.

मंत्र.

ओम सहनाववतु सह नौ भुनक्तु  ।   सह वीर्यं करवावहै  तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै ।

परमात्मा आम्हा दोघांचे रक्षण करो आम्हा दोघांचे पालन करो .आम्ही दोघांनी एकाच वेळी सामर्थ्य  संपादन करावे. आमच्या अध्ययनाने आम्हास आत्म प्रकाश होऊन आमच्याकडून एकमेकांचा द्वेष न होवो.आम्हाला आत्मशांती प्राप्त होवो.

## ४. प्रश्नोपनिषद

प्रश्नोपनिषद अथर्ववेदात आढळते. त्यामध्ये सहा भाग आहेत प्रत्येक विभागात शिष्यांनी सद्गुरुला एकेक प्रश्न विचारलेला असून त्याचे उत्तर पण त्यातच आहे. सर्व शिष्यांना आत्मज्ञानाची तीव्र जिज्ञासा होती.

अर्थात सर्वच प्रश्न परमार्थात उपयोगी पडणारे आहेत त्यामधील शेवटचे तीन प्रश्न साधकाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे आहेत त्यातल्या त्यात पाचव्या प्रश्नात ओमकार उपासना  सांगून सहाव्या षोडश कलांनी पूर्ण अशा आत्म्याचे निरूपण केल्याने ते दोन प्रश्न या उपनिषदांचे रहस्य होय यातील मंत्र बहुतांशी गद्यात आहेत.

मंत्र

ओम भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।

स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः।

व्यशेम देवहितं यदायुः।।

हे देवांनो! आम्ही आमच्या कानांनी कल्याण मय वचने ऐकावीत. आम्ही आमच्या डोळयांनी शुभ दृश्य पहावीत. तुम्ही पूजनीय आहात आम्हास दिलेले आयुष्य उत्तम प्रकृतीने भोगून आमच्याकडून तुमची स्तुती व्हावी.

## ५. मुण्डकोपनिषद

मुण्डकोपनिषद अथर्ववेदात आढळते. या उपनिषदाचे 3 अध्याय असून प्रत्येक अध्यायाचे दोन खंड आहेत. मुंडक शब्दाचा मूळ धातू मुंड म्हणजे मुंडन करणे असा आहे अर्थात मनाचे मुंडन करून अवैद्य पासून किंवा अज्ञानापासून मोकळे करणारे ज्ञान ते मुंडक असा मुंडक शब्दाचा अर्थ सांगतात. या उपनिषदांमध्ये आत्मज्ञान हेच तेवढे ज्ञान या नावाला पात्र आहे असे स्पष्टपणे सांगितले असून इतर सर्व प्रकारच्या ज्ञान वअज्ञानसांगितलेलेआहे. आत्म ज्ञानानेच ईश्वर प्राप्ती होते. यज्ञयागादी पूजापाठ तीर्थयात्रा श्रौत आदि स्मार्त कर्माने ती होत नाही. असे मुण्डकोपनिषद सांगणाऱ्या ऋषींचे मत आहे. आत्मज्ञान साध्य होण्यासाठी मनुष्याच्या अंगी खरी संन्यास वृत्ती बांधावी लागते. संन्यस्त वृत्ती बाणवून घेण्यास एकांताचे सेवन करावे लागते. आणि एकांताचे सेवन करीत असता आत्म्याचे अनुसंधान टिकविण्याची युक्ती मिळविण्यासाठी सद्गुरूच्या मार्गदर्शनाची गरज असते खऱ्या साधकाला अत्यंत उपयोगी पडणाऱ्या सूचना या उपनिषदांमध्ये केलेले आहेत. म्हणून हे उपनिषद पूर्वीपासून प्रसिद्ध आहे.

मंत्र -ओम ब्रह्मा देवानां प्रथमः संबभूव। विश्वस्य कर्ता भूवनस्य गोप्ता। स ब्रह्मविद्यां सर्वविद्याप्रतिष्ठाम्। अथर्वाय ज्येष्ठपुत्रा प्राह|

सर्व देवांमध्ये पहिला विश्वाचा निर्माता आणि सर्व भवनांचा पालन कर्ता ब्रह्मा उत्पन्न झाला. सर्व विद्यांचे आश्रयस्थान असणारी ब्रह्मविद्या आपला ज्येष्ठ पुत्र अथर्वा याला ब्रह्मदेवाने सांगितली.

### ६. माण्डूक्योपनिषद.

मांडक्योपनिषद अथर्ववेद ब्राह्मण भागात आढळते याच्यामध्ये एकूण फक्त बाराच मंत्र आहेत दहा उपनिषदांमध्ये सर्वात लहान असलेले हे उपनिषद साधकाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानतात. प्रणव म्हणजे ओमकार या सर्व माननीय परमेश्वराच्या प्रतीकाचे सविस्तर विवेचन या उपनिषदात केले आहे. अ उ म या तीन मात्रा मिळून ओमकार बनतो. ओमकार हे परब्रह्माचे मुख्य नाव आहे. ओमकाराचे ज्ञान झाले असता परब्रह्माचे ज्ञान होते आणि ओमकाराची उपासना हीच परब्रह्माची उपासना होय. असे स्पष्ट मत स्वानुभवाच्या आधाराने ऋषी येथे प्रतिपादित करतात. स्थूल सूक्ष्म व कारण या तीन पातळीवर एकच आत्मवस्तु विश्वामध्ये विलास करते असा साक्षात अनुभव साधकाला येतो. आणि त्यातूनच पुढे तो निर्गुण ब्रह्मामध्ये लीन होतो. आनंद हा प्रधान असल्याने आणि त्या अवस्थेत सच्चिदानंदाचा साक्षात्कार होत असल्याने, तिलाच साधुसंत ईश्वर दर्शन असे म्हणतात.

"अयम् आत्मा ब्रह्म "

हे या उपनिषदाचे महावाक्य आहे.

मंत्र

ओम् इति एतद् अक्षरम्

इदं सर्वं तस्योपव्याख्यानम् ।

भूतं भवद् भविष्यद् इति सर्वम्

ओंकार एव ।

यच्च अन्यद् त्रिकालातीतं तदपि ओंकार एव ।।

ओम हे अक्षरच सर्वकाही आहे हे सर्व विश्व आहे.हे उपनिषद् त्याचे व्याख्यान विवेचन आहे. या विश्वात पूर्वी झालेले आता असलेले आणि पुढे होणारे हे सर्व ओंकार होय. इतकेच नव्हे तर याहून निराळे म्हणजे कालातीत सुद्धा ओमकार होय.

### ७. त ैत्तिरीयोपनिषद

तैत्तिरीय उपनिषद कृष्णा यजुर्वेदाच्या ते तीर्थ शाखेचे उपनिषद असून त्याचे तीन प्रधान विभाग आहेत. प्रत्येक विभागास वल्ली असे नाव दिलेले आढळते प्रथम शिक्षावल्ली, दुसरी ब्रह्मानंदवल्ली, तिसरी भृगुवल्ली.

या जगात साधकाने कसे वागावे तसेच शूद्र आनंदांना मागे टाकून त्याने आत्मा आनंदाची प्राप्ती कशी करून घ्यावी? हे या उपनिषदांमध्ये फारच सुंदर रीतीने सांगितले आहे. त्याच प्रमाणे या दृश्य सृष्टीमध्ये देखील सर्व ठिकाणी परमेश्वराचाच विलास आहे. असे सांगून हे उपनिषद संपते आनंदाची म्हणजे भगवंताची उपासना करणाऱ्या साधकांना या उपनिषदाचे महत्त्व विशेष वाटेल यात शंका नाही.

मंत्र

ओम् शं नो मित्रः शं वरुणः । शं नो भवतु अर्यमा । शं नो इन्द्रो बृहस्पतिः । शं नो विष्णुः उरुक्रमः ।।

मित्र म्हणजे सूर्य आम्हाला सुख समाधान देवो. वरूण ,अर्यमा , इंद्र आणि बृहस्पति या देवता आम्हाला समाधान देवोत. मोठ्या व्यापक पावलांचा विष्णू आम्हाला समाधान देवो .ब्रह्माला नमस्कार असो.

## ८. बृहदारण्यक उपनिषद

सर्व उपनिषदांमध्ये विस्ताराने मोठे असलेले बृहदारण्यकोपनिषद् असून त्यामध्ये आत्मा व परमात्मा यांचे ऐक्य अंती परिणामकारक रीतीने प्रतिपादन केलेले आढळते. याच कारणाने श्रीशंकराचार्य यांनादेखील भाषण लिहिताना विशेष स्पूर्ती आलेली दिसते. शतपथ ब्राह्मण मध्ये आलेले हे उपनिषद तीन कांडाचे बनलेले आहे .पहिले मधुकांड याच्यामध्ये आत्मा व परमात्मा एकच कसे आहेत ? सर्व ठिकाणी एकच आत्मा कसा भरून राहिला आहे. हे अनुभवाच्या आधाराने दाखविले आहे. हे उपदेश कांड होय.

दुसरे याज्ञवल्क्य कांड किंवा मुनी कांड याच्यामध्ये आत्मा व परमात्मा यांचे ऐक्य तर्काच्या अनेक युक्त्या वापरून दाखविले आहे .हे उपपत्ती कांड होय.

तिसरे खिलकांड- याच्यामध्ये आत्मा व परमात्मा यांचे ऐक्य अनुभवास येण्यासाठी जरूर असणारे अनेक मार्ग सांगितले आहेत हे उपासना कांड होय.

अहं ब्रह्मास्मि | /अयम् आत्मा ब्रह्म |इत्यादी महावाक्य आणि जनक याज्ञवल्की संवाद , तसेच याज्ञवल्क्य मैत्री संवाद याच उपनिषदात आहेत शतपथ ब्राह्मणाचे काण्व आणि माध्यंदिन असे दोन पाठ असून येथे काण्व पाठ स्वीकारला आहे.

मंत्र

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।

के सच्चिदानंदघन ! परब्रह्म सर्व प्रकारे परिपूर्ण आहे.हे जग त्याच्यापासून उत्पन्न झालेले असल्याने ते देखील पूर्ण आहे. पूर्णब्रह्मातून पूर्ण जगात निराळे काढले तरी पूर्ण ब्रह्माच्या पूर्णतेत फरक पडत नाही.

## ९. ऐतरेयोपनिषद

ऋग्वेदातील ऐतरेय आरण्यकातील चौथा अध्याय पासून ते सहाव्या अध्याय पर्यंत ऐतरेय उपनिषद् आहे.

या उपनिषदांमध्ये मानवाच्या शरीराची उपयोगिता किती महत्त्वाची आहे ? याचे अतिशय मार्मिक वर्णन केलेले आहे प्रज्ञानं ब्रह्म | हे महावाक्य या उपनिषदांमध्ये आहे त्या उपनिषदामध्ये मुख्यतः सृष्टीवाद आदर्शवाद व प्रज्ञानाचे निरूपण केले आहे.

## १०. छांदोग्य उपनिषद

दहा उपनिषदातील शेवटचे आणि बृहदारण्यक उपनिषदाच्या खालोखाल मोठे असलेले हे छांदोग्य उपनिषद सर्व उपनिषद वांग्मयात अत्यंत बोधप्रद मार्गदर्शक म्हणूनच महत्त्वाचे आहे. सामवेदातील छांदोग्य शाखेचे हे ब्राह्मण उपनिषद असून याचे आठ अध्याय आहेत पहिल्या दोन अध्याय मध्ये कर्मयुक्त उपासना सांगितली आहे. उपासना म्हणजे चिंतन किंवा ध्यान उपासना केल्याने चित्ताची शुद्धी होते. चित्त शुद्ध झाल्याने त्याचे जडत्व नाहीसे होते. जडत्व नाहीसे झाल्याने चित्त सूक्ष्म बनून आत्मसाक्षात्कार करण्यास योग्य होते. त्यामुळे चित्त स्थिर झाल्यावर ज्ञानाचा उदय होऊन देवाचा साक्षात्कार होतो. परमेश्वर निष्ठ पुरुष जीवन मुक्त होऊन अखंड शांतीचा अनुभव स्वतः घेतो. तसाच अधिकारी शिष्यास देतो.पुढील अध्यायांमध्ये वेगवेगळ्या देवतांची उपासना व विद्ये विषयी वर्णन सांगितलेले आहे या उपनिषदाचे साधकासाठी अनन्यसाधारण महत्त्व आहे.

मंत्र

ॐ आप्यायन्तु ममांगानि वाक् प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च।

सर्वाणि सर्व ब्रह्मौपनिषदं माहं ब्रह्म निराकुर्या मा मा ब्रह्म निराकरोद् अनिराकरणमस्तु अनिराकरणमस्तु मे अस्तु तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्माः ते मयि सन्तु ते मयि सन्तु।।

माझे हात पाय वाणी प्राण डोळे कान पुष्ट होवोत. सर्व इंद्रियांना बळ येवो. उपनिषदांनी सांगितलेले जे जे ब्रह्म त्याचे निराकरण मी न करावे, व त्याने माझे निराकरण न करावे माझे निराकरण असो. उपनिषदात सांगितलेले धर्म आत्म्यामध्ये नीरज असलेला जो मी त्या माझ्या ठिकाणी येवोत.

**उपनिषद्धर्माः सर्वेषु सन्तु।**

**********

**- उपनिषदमाहितीसंकलन**

**-श्री.गणेशदेव सोन्नर**

## शब्दार्थाः |

### श्लोक १

दिक् - दिशा

अनवच्छीन्नम् - जे मोजले जाऊ शकत नाही असे

चिन्मात्र - चेतन स्वरूप

### श्लोक २

किंचिज्ज्ञ - थोडेसे जाणणारा

समभवम् - झालो

अवलिप्तम् - गर्वाने युक्त

ज्वरः -ताप

व्यपगत - दूर निघून गेला

### श्लोक ३

अम्भोजिनी - कमळ

विधाता - ब्रह्मदेव

कुपितः - रागावलेला

नितराम् - पूर्णपणे

### श्लोक ४

केयूराणि - बाजूबंद

विलेपनम् - उटणे

मूर्धजाः - केस

समलंकरोति - नटविते

## श्लोक ५

प्रच्छन्न - झाकून ठेवलेले

नरस्य - माणसाचे

विद्याविहीन: - विद्येशिवाय

## श्लोक ६

दाक्षिण्यम् – सरलता , औदार्य

परिजन – सेवक

शाठ्यम् – जशास तसे

नय: - मुत्सद्दीपणा

## श्लोक ७

जाड्यम् – मन्दपणा

धिय: - बुद्धिचा

सिञ्चति – सिञ्चन करते

अपाकरोति – दूर करते

प्रासदयति – प्रसन्न करते

दिक्षु – सर्व दिशांमध्ये

तनोति – पसरवते

## श्लोक ८

जयन्ति – विजयी होतात

सुकृतिन: - चांगले कृती करणारे

रससिध्दा: - रसनिर्मिती करण्यात सिध्दहस्त असे

कवीश्वरा: – कवी

### श्लोक ९

प्रारभ्यते – सुरु करणे

विरमन्ति – थांबतात

प्रतिहन्यमाना: - पुन्हा पुन्हा आघात झालेले

प्रारब्धम् – सुरु केलेले

### श्लोक १०

सावधानमनसा – सावध मनाने

श्रूयताम् – ऐक.

अम्भोदा: - मेघ

आर्द्रयन्ति – भिजवतात

दीनम् – केविलवाणे

ब्रूहि – बोलू

### श्लोक ११

प्रच्छन्नम् -गुप्तपणे

उपगते - आला असता

संभ्रमविधि:-त्वरेने आदर सत्कार करणे

सदसि-सभेमध्ये

अनुत्सेक:-गर्व नसणे

## श्लोक १२

श्रोत्रम् – कान

विभाति – शोभून दिसते

पाणि: - हात

काय:- शरीर

## श्लोक १३

गुह्यम्-गोपनीय

जहाति-टाकणे

निगूहति –गुप्त ठेवणे

सन्त:-सज्जन

प्रवदन्ति-कथयन्ति

## श्लोक १४

उदकम् / पयस: – पाणी

दत्ता: - दिले

अखिला: - सर्व

कृशानौ – अग्नीमध्ये

## श्लोक १५

श्रुतस्य –शास्त्राध्ययनाचे

वित्तस्य- द्रव्याचा

प्रभवितु: - सामर्थ्याचा

## श्लोक १६

निपुणाः - पारंगत

समाविशतु-येवो

युगान्तरे-युगानंतर

## श्लोक १७

कदर्थितस्य - तिरस्कृत झालेल्या

प्रमार्ष्टुम् - नाहीसा करणे

शिखा - ज्वाला

न याति - जात नाही

## श्लोक १८

तरवः - वृक्ष

फल उद्गमैः - फळांच्या भारांनी

अम्बुभिः- नवीन पाण्याने

विलम्बिनः - लोंबणारे

अनुद्धता - विनयशील होतात

## श्लोक १९

आलस्यम् -आळस

रिपुः - शत्रू

उद्यमसमः - उद्योगासारखा

अवसीदति - फळ मिळणे

## श्लोक २०

गुणौघजनीम्- अनेक गुण उत्पन्न करणाऱ्या

अनुवर्तमानाः - पालन करणारे

असून्-प्राण

## श्लोक २१

आकृतिः - उत्तम रूप

यत्नकृता - प्रयत्नपूर्वक केलेली

पूर्व तपसा - पूर्वी केलेल्या पुण्यामुळे

काले - योग्यवेळी

********************




चित्र – कु.कल्पना